नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १५० * * अकोला * | बुधवार, दिनांक ३ डिसेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरूच

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २ :
नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी म्हणाले, 'ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे. मे २०२५ मध्ये सुरू झालेल्या या ऑपरेशनदरम्यान भारतीय नौदलाने पाकिस्तानी नौदलाविरुद्ध मजबूत तैनाती केली. यामुळे पाकिस्तान नौदल आपली जहाजे बंदरांमधून बाहेर काढू शकले नाही आणि अरबी समुद्राजवळच्या मकरान किनारपट्टीपर्यंतच मर्यादित राहिले.'
नौदल प्रमुखांनी सांगितले की, गेल्या ७-८ महिन्यांपासून पश्चिम अरबी समुद्रात आमचे ऑपरेशन सातत्याने सुरू आहे. यामुळे पाकिस्तानकडे जाणाऱ्या व्यापारी जहाजांचे मार्ग कमी झाले आहेत.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## निकालाची वेदना

आज उच्च न्यायालयाने म्हणजे त्यांच्या खंडपीठाने एक महत्त्वाचा निर्णय दिला. नगरपरिषदा आणि नगरपंचायत यांचे जे मतदान आज घेतलेले आहे. त्याचा उद्या म्हणजे ३ डिसेंबरला मतमोजणी होऊन निकाल येणे अपेक्षित होते. तो निकाल आता खंडपीठाच्या आदेशानुसार पुढे ढकलण्यात आलेला आहे. काही नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचे मतदान काही खत्रूड कारणांमुळे पंधरा-सोळा दिवस पुढे ढकलण्यात आलेले आहे, त्यामुळे उद्या जाहीर होणारे सर्व निकाल आता २१ डिसेंबर या तारखेला जाहीर होतील असा आपल्या उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निर्णय दिला आहे. हा निकाल जाहीर करत असताना न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या बऱ्याच गोष्टींवर ताशेरे ओढलेले आहेत. त्यासोबतच ऐनवेळी असे अनावधानी कार्य करू नका हेही सांगून निवडणूक आयोगाचे कान उच्च न्यायालयाने उपटलेले आहेत. लोकसभा आणि विधानसभा यांचे ठीक आहे. पण पाच ते दहा हजार मतदान असलेल्या प्रभागातील निकाल इतके दिवस लांबवणे, म्हणजे त्या बिचाऱ्या उमेदवारांची झोप उडवण्यासारखे आहे. आजकाल न्यायालये इतकी व्यस्त झालेली आहेत की, कोणत्याही न्यायालयाला कुठला निर्णय किती महत्त्वाचा आहे याचा विचार करायला वेळच नाही. कारण महाराष्ट्रातले दोन दोन पक्ष फुटल्यावर त्याचा चार चार वर्षे निकाल येत नाही. आताही दोन पंचवार्षिक योजना झाल्यावर भल्याबुऱ्या पद्धतीने निवडणुका होत आहेत. कसेही करून या निवडणुका होण्यापूर्वी न्यायालयाने हा शहाणपणा दाखवला असता तर सर्वांचेच मतदान एकाच दिवशी घेता आले असते. ऐन निवडणुकीच्या वातावरणात आरक्षणामधील टक्क्यां बाबतचे तर्कट निघाले आणि या निवडणुकींचा पोरखेळ झाला. एखाद्या ठिकाणी थोडाफार फरक झाला किंवा एखाद्या प्रवगार्ला जास्त जागा मिळाल्या तर त्यासाठी असा द्राविडी प्राणायाम करणे व्यावहारिक नाही. हे आपल्या काथ्याकूट करणाऱ्या वकिलांना आणि न्यायाधीशांना कोण सांगणार आहे आणि जरी सांगितले तरी न्यायालयाचा अपमान होतो. त्या अपमानाला शिक्षा असते आणि त्यासाठी माफीची भिक्षाही असते. आमचे काही चुकले असेल तर आम्ही हात जोडून माफी मागायला तयार आहोत. पण आपल्या न्यायालयाच्या कार्य कक्षेत राहून आपण तसे निर्णय तरी दिले पाहिजेत. निर्णयाची थैली खुंटीवर अडकवून तारखांवर तारखा देऊन न्यायदानाचे विलंबीकरण सुरू आहे. ही गोष्ट कितपत योग्य आहे ते आम्हाला माहीत नाही. मात्र याचमुळे शहाण्याने कोर्टाची पायरी चढू हे असे म्हणतात. गंमत अशी आहे की कोर्टाची पायरी फक्त जे शहाणे असतात तेच शहाणे चढतात. त्यांना छोट्या छोट्या गोष्टींचा कीस काढून काथ्याकूट करणारे अतिशहाणे वकील मिळतात. वेगवेगळ्या वाटेला फाटे फोडणारे महा विद्वान भारतात काही कमी नाहीत. एका सुनावणीसाठी दहा दहा, वीस वीस लाख रुपये घेणारे बरेच वकील या देशात उपलब्ध आहेत. सामान्य माणसाला बऱ्याच गोष्टी बरोबर कळतात. जे होत आहे ते बरोबर होत नाही असे सर्वसामान्यांना वाटते, पण त्यांचीही हे खरे शब्द बोलताना फाटते. आता हेच पहा ना, नगराध्यक्ष पदाची किंवा नगरसेवकाची स्वप्ने पाहणारे स्वप्नाळू उमेदवार वारंवार खर्च करून पदलालचित पदारूढ होण्यास कालपर्यंत दोन्ही पायांवर उभे होते. आज न्यायालयाच्या निर्णयाने त्यांना एका पायावर उभे राहण्यास भाग पाडलेले आहे. पंधरा-वीस दिवसात धावाधाव, मेहनत करून आणि तहानभूक विसरून रिकाम्या पोटाने साफ निराशा झाली आहे. आशेच्या मंदिरावर आपला ध्वज फडकवण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या या स्वप्नाळू लोकांवर २१ तारखेपर्यंत निकालाची वाट बघण्याची वेळ आता आलेली आहे. त्यामुळे त्यांना झोपेच्या गोळ्या खाऊनही झोप येणार नाही, हे ब्रह्मसत्य आहे. अशा या बिचाऱ्यांच्या वेदनेमध्ये आम्ही सहभागी आहोत.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# निवडणुकीचा खेळखंडोबा!

३ डिसेंबरची मतमोजणी रद्द : आता २१ डिसेंबरला निकाल : मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा निर्वाळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :
राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा ताण-तणाव वाढत असताना, मतमोजणीच्या तारखेबाबत आता मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.



सुरुवातीला राज्य निवडणूक आयोगाने २ डिसेंबरला मतदान आणि ३ डिसेंबरला निकाल जाहीर होईल, असे सांगितले होते. मात्र काही नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये न्यायालयीन पेच निर्माण झाल्याने आयोगाने आपल्या कार्यक्रमात बदल करत, ज्या ठिकाणी वाद सुरू आहे, तेथे २० डिसेंबर मतदान व २१ डिसेंबरला निकाल असा नवीन आदेश देऊन परिस्थिती अधिक गुंतागुंतीची केली होती.
याच पार्श्वभूमीवर आता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. त्यानुसार उद्याची मतमोजणी रद्द करण्यात आली आहे. आता २१ डिसेंबरलाच सर्व ठिकाणचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. तोपर्यंत आचारसंहिता कायम राहणार आहे.
खंडपीठाने सोमवारच्या सुनावणीत निवडणूक आयोगाच्या वकिलांना थेट विचारणा केली होती, सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल २१ डिसेंबरलाच देता येतील का? न्यायालयाने विचारलेल्या या प्रश्नामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे झाले होते. आयोगाच्या वकिलांनी मात्र यावर तात्काळ उत्तर न देता, आज दुपारी यासंदभार्तील निवेदन सादर करू असे सांगितले होते. त्यानुसार आता न्यायालयाने सर्वच ठिकाणचा निकाल आता २१ डिसेंबरलाच लागणार आहे.
निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व तयारी पूर्ण केल्याचे प्रतिज्ञापत्र न्यायालयाकडे सादर केले होते. मतदान असलेल्या सर्व क्षेत्रांमध्ये यंत्रणा केंद्रावर पोहोचली असून, कर्मचाऱ्यांनी आपली तयारी दाखवली आहे. त्यामुळे मतदान थांबवणे योग्य नाही, असे मत न्यायालयाने स्पष्ट केले होते.
तथापि निकालाची तारीख पुढे ढकलल्यास जनतेच्या मनातील संभ्रम आणि राजकीय तणाव यावर अधिक परिणाम होऊ शकतो, असे निरीक्षणही न्यायाधीशांनी नोंदवले होते. त्यानुसारच न्यायालयाने आजचा निर्णय दिला आहे.
दरम्यान, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ८ ते १० वर्षांनंतर होत असल्याने मतदारांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे.
आज राज्यातील २६४ नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी मतदान घेण्यात आले. मतमोजणीचा दिवसच निश्चित नसल्याने उमेदवार आणि कार्यकर्त्यांमध्ये मात्र बेचैनीचे वातावरण होते. मतदारांनी दाखवलेला विश्वास नेमका कधी उघड होणार? निवडणूक आयोग पुन्हा कार्यक्रमात बदल करणार का? न्यायालयाचा आदेश कोणत्या दिशेने वळणार? या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत राजकीय तणाव वाढत गेला. मात्र, आता अपेक्षेप्रमाणेच सर्वच निकाल लांबणीवर पडला आहे.

## असा प्रकार प्रथमच पाहतोय..

फडणवीसांनी पुन्हा व्यक्त केला संताप



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
राज्यातील काही नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकींमध्ये प्रलंबित प्रक्रियेमुळे उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. 20 नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकींच्या निकालाबाबत न्यायालयाकडून सूचना मिळाल्या होत्या. याचिकाकारांनी निवडणुकीचा निकाल सर्व ठिकाणी एकाच दिवशी निकाल करण्याची मागणी केली होती. त्यामुळे, खंडपीठाने सर्व ठिकाणच्या निवडणुकींचा निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबर रोजी जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत.
यावर प्रतिक्रिया देताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माझ्या इतक्या वर्षांच्या राजकारणाच्या अनुभवात हा प्रकार प्रथमच पाहतोय. ते म्हणाले की, निवडणुका जाहीर झाल्या, मतदानही झाले, पण निकाल इतक्या वेळाने लागणार आहे. कोर्टाच्या हस्तक्षेपामुळे निकाल पुढे ढकलला जाणे लोकशाहीच्या तरी पद्धतीला अनुरूप नाही. त्यांनी नमूद केले की, हे प्रकार राजकीय खोलात जातात, पण त्याचा सर्वाधिक फटका अनेक उमेदवार व कार्यकर्त्यांना बसणार आहे.
फडणवीस पुढे म्हणाले की, मी निवडणूक आयोगावर आरोप करणार नाही, पण ज्यावेळी नियमांचा चुकीचा अर्थ लावला जातो, तेव्हा प्रक्रियेवर प्रश्न येते. त्यांनी सांगितले की, जिथे सर्व काही योग्य पद्धतीने पार पडले आहे, तिथेही निकाल पुढे ढकलला गेला हे न्यायालयाने केलेले असून, निवडणूक आयोगाने पुढच्या निवडणुका योजताना या चुका टाळाव्यात, अशा सूचनाही त्यांनी केल्या.
राज्य निडवणूक आयोगाचा निवडणुका लांबणीवर टाकण्याचा निर्णय अतिशय चुकीचा असल्याचा संताप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सकाळी देखील पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला होता. निवडणूक आयोगाने कायद्याचा चुकीचा अर्थ लावला. आयोग कोणता कायदा काढतंय किंवा तो कुणाचा सल्ला घेत आहे याची मला कल्पना नाही. पण एखादा व्यक्ती कोर्टात गेला म्हणून निवडणूकच पुढे ढकलायची हे अतिशय चुकीचे आहे, असे ते म्हणाले होते.

## राज्यात सरासरी ६७ टक्के मतदान



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :
राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतीसाठी आज मंगळवारी मतदान पार पडले. या मतदानाचा उत्साह कायम होता. कारण बुधवार ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होवून निकाल जाहीर होणार होता आणि निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार होते.
तथापि, न्यायालयाच्या आदेशाने ही मतमोजणी आता २१ डिसेंबर रोजी होणार असून, ऐन मतदानाच्यावेळीच मतदारांचा उत्साह मावळल्याचे दिसून आले. मंगळवारी झालेल्या मतदानाची अंतिम आकडेवारी अद्याप समोर आली नसली तरी, सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत राज्यभरात सरासरी ६७ टक्के मतदान झाल्याची माहिती आहे. दरम्यान, आजच्या मतदानावेळी राज्याच्या अनेक भागात बोगस मतदानाच्या बातम्या पुढे आल्या. बुलढाण्यात बोगस मतदानाचा प्रकार काँग्रेस नेत्यांनी हाणून पाडला. कुठे पैशाचे वाटप झाले तर काही ठिकाणी हाणामारीच्या घटना घडल्या.
राज्यातील २६२ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदासाठी आणि ६०४२ सदस्यपदांच्या जागांसाठी आज (मंगळवारी) मतदान प्रक्रिया पार पडली. सकाळी ७.३० वाजता सुरू झालेली ही मतदान प्रक्रिया सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत चालली. मात्र, अनेक मतदान केंद्रांवर सायंकाळी उशिरापर्यंत मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. आज हजारो उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये कैद झाले आहे.

## पीएमओचे नाव सेवा तीर्थ

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २ :
केंद्र सरकारने पंतप्रधान कार्यालय चे नाव बदलून 'सेवा तीर्थ' केले आहे. तर देशभरातील राजभवनांना 'लोक भवन' असे संबोधले जाईल. तसेच, केंद्रीय सचिवालयाचे नाव 'कर्तव्य भवन' असेल.
पंतप्रधान कार्यालयाने म्हटले आहे की, 'आम्ही सत्तेकडून सेवेकडे वाटचाल करत आहोत.' 'हा बदल प्रशासकीय नसून सांस्कृतिक आहे.' 'सार्वजनिक संस्थांमध्ये मोठे बदल होत आहेत.'
यापूर्वी केंद्र सरकारने राजपथचे नाव बदलून 'कर्तव्य पथ' केले होते. तर पंतप्रधान निवासस्थान आता 'लोक कल्याण मार्ग' म्हणून ओळखले जाते. यापूर्वी पंतप्रधानांचे अधिकृत निवासस्थान 'रेस कोर्स रोड' म्हणून ओळखले जात होते, जे २०१६ मध्ये बदलण्यात आले.
केंद्रीय गृह मंत्रालयाने गेल्या वर्षी राज्यपालांच्या परिषदेत झालेल्या चर्चेचा हवाला देत म्हटले आहे की, 'राजभवन' हे नाव वसाहतवादी मानसिकतेचे प्रतीक आहे. त्यामुळे राज्यपाल आणि उप-राज्यपालांच्या कार्यालयांना आता 'लोक भवन' आणि 'लोक निवास' या नावाने ओळखले जाईल.

## निवडणूक सुधारणांवर लोकसभेत ९ डिसेंबरला चर्चा

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २ :
लोकसभा ९ डिसेंबर रोजी निवडणूक सुधारणांवर चर्चा करणार आहे. गेल्या दोन दिवसांपासून संसदेत तात्काळ चर्चा व्हावी यासाठी आग्रही असलेल्या विरोधी पक्षाने चर्चेला सहमती दर्शवली आहे.
लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतल्यानंतर काँग्रेस नेते के. सुरेश म्हणाले, डिसेंबर रोजी निवडणूक सुधारणांवर १० तासांची चर्चा होईल. त्यांनी असेही सांगितले की, वंदे मातरमवर एक दिवस आधी, ८ डिसेंबर रोजी चर्चा होईल. यासाठीही दहा तासांचा वेळ देण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी चर्चेला सुरुवात करतील. सरकार १५० व्या वर्धापन दिनानिमित्त सभागृहात वंदे मातरमवर चर्चा करत आहे.




हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दोन दिवसांत गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज विस्कळीत झाले. रक्कवर तात्काळ चर्चा व्हावी आणि मतदानात हेराफेरीचे आरोप व्हावेत यासाठी विरोधकांनी आग्रह धरला. संसद संकुलातील मकर गेटसमोर सकाळी १०:३० वाजता विरोधकांनी सलग दुसऱ्या दिवशी एसआयआर विरोधात निदर्शने केली.
काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी राज्यसभेत सांगितले की, ₹रक्क प्रक्रियेदरम्यान १२-१३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.₹ हा एक तातडीचा विषय आहे. यावर त्वरित चर्चा झाली पाहिजे. विरोधकांनी मत चोर, सिंहासन सोडा₹ अशा घोषणा देत दोन्ही सभागृहांचे कामकाज विस्कळीत केले.

## यूपीमध्ये बसला भीषण आग : ३ जण जिवंत जळाले : २४ जण भाजले

■ वृत्तसंस्था, बलरामपूर, दि. २ :
यूपीच्या बलरामपूरमध्ये ट्रकच्या धडकेनंतर बसला आग लागली. ३ लोक जिवंत जळाले आणि २४ जण भाजले. यापैकी ६ जणांची प्रकृती गंभीर आहे. बस नेपाळ सीमेजवळील सोनौली येथून निघाली होती आणि दिल्लीला जात होती.
बसमध्ये ४५ प्रवासी होते. बहुतेक नेपाळचे होते. बसच्या चालक आणि कंडक्टरचा अद्याप शोध लागलेला नाही. धडक इतकी भीषण होती की बस १०० मीटरपर्यंत फरफटत जाऊन हायटेन्शन लाईनच्या विजेच्या खांबाला धडकली. खांब तुटून बसवर पडला. बसमध्ये करंट पसरला. शॉर्ट सर्किट झाले आणि आग लागली.
बघता बघता बस आगीचा गोळा बनली. प्रवासी आतच अडकले. जीव



वाचवण्यासाठी काच फोडून बाहेर उड्या मारू लागले. कसेबसे बाहेर पडलेल्या प्रवाशांनी पोलिसांना माहिती दिली. अग्निशमन दलाच्या पथकाने आग विझवण्याचे काम सुरू केले. अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढले. जखमींना रुग्णालयात पोहोचवण्यात आले.

## मतदाराच्या बोटाला शाई लावणेच विसरले

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २ :
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वर्धा येथील एका मतदान केंद्रावरील निवडणूक कर्मचारी गप्पा मारण्यात व्यस्त असल्यामुळे एक मतदार मतदान केल्यानंतर बोटाला शाई न लावताच मतदान केंद्राबाहेर पडल्याचे दिसून आले.
वर्ध्यातील केसरीमल कन्या शाळा, रूम नंबर १ मध्ये ही घटना घडली आहे. विजय उपशाम नामक मतदाराने आपले मत नोंदवले. मात्र, मतदानाची प्रक्रिया पूर्ण करताना मतदान केंद्रावरील संबंधित कर्मचारी दुगप्पांमध्ये इतके गुंग होते की, त्यांनी त्यांच्या बोटाला शाईच लावली नाही. त्यांनी या प्रकरणाची माहिती आपल्या ओळखीच्या लोकांना दिली. राज्यात दुबार मतदानावरून रान पेटले असताना हा प्रकार घडल्यामुळे मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.
दरम्यान, हा प्रकार उजेडात आल्यानंतर तातडीने विजय उपशाम यांना पुन्हा मतदान



केंद्रावर नेण्यात आले. तिथे त्यांच्या बोटाला शाई लावण्यात आली. मतदानासारख्या संवेदनशील प्रक्रियेत असा गलथानपणा केल्याबद्दल निवडणूक आयोगाच्या यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

## आ. संतोष बांगर यांना फटकार

■ वृत्तसंस्था, हिंगोली, दि. २ :
हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथील मतदान केंद्र क्रमांक ३ येथे आमदार संतोष बांगर मतदानासाठी आले, परंतु त्यांनी प्रत्यक्ष मतदान करत असलेल्या एका महिला मतदाराला ईव्हीएमवर मतदान करण्यासाठी मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी घोषणाबाजी करत, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेंचा विजय असो, एकनाथ शिंदे आगे बढो.. अशा घोषणा दिल्या. त्याच वेळी बांगर यांनी मोबाइल फोनचा वापर देखील केला.



या सर्व वर्तनामुळे मतदान केंद्रात शांततेचा भंग झाला आणि हा प्रकार सोशल मीडियावर व्हायरल झाला. या घटनेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बांगर यांना फटकारले आहे. लोकप्रतिनिधींनी लोकशाहीचा आदर ठेवला पाहिजे; मतदान केंद्रावर असे वर्तन करण्यास हरकत आहे. त्यांनी मतदार आणि मतदान केंद्राचा सन्मान राखला पाहिजे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**संतोष बांगरांवर गुन्हा दाखल**

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांच्यावर मतदान गोपनीयतेचा भंग केल्याप्रकरणी आज हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते. अखेर या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्याची माहिती पुढे आली आहे.



# निवडणूक आयोगालाही कोर्टात खेचणार

## नीलेश राणे यांचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
रायगड जिल्ह्यातील मालवण नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या आधीच चर्चेत आहेत. मतदानाच्या अगोदरच रात्री पोलिसांनी नाकाबंदी केली, आणि त्या तपासणीत एका कारमधून दीड लाख रुपये रोकड जप्त झाली. हे वाहन भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्याचे असल्याचे सांगितले जात आहे. अशी मोठी रोकड निवडणुकीच्या आधी सापडणे म्हणजेच मतदान प्रक्रियेला धक्का देणारी घटना, अशी प्रतिक्रिया अनेक पक्षांनी व्यक्त केली. या घटनेने संपूर्ण मालवणमध्ये राजकीय तापमान वाढवले आहे.

या घटनेनंतर शिवसेना शिंदे गटाचे आमदार नीलेश राणे यांनी खूपच आक्रमक भूमिका घेतली आहे. या संदर्भात राणे म्हणाले की, मतदानाआधी पैसे वाटप करण्याची योजना चालू होती, आणि ही कारवाई पकडली गेली आहे.

मात्र, या प्रकारावर अजूनपर्यंत कोणतीही एफआयआर दाखल नाही, असा त्यांचा आरोप आहे. त्यांनी पोलिस ठाण्यात ठिय्या देत त्यांनी भाजप विरोधातील लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मतदार, कार्यकर्ते आणि प्रशासनाकडे त्यांनी सक्रिय कारवाईची मागणी केली.

आज सकाळी निवडणूक अधिकाऱ्यांच्या भेटीनंतर, नीलेश राणे यांनी माध्यमांशी संवाद साधत सांगितले की, ही घटना माज्या लक्षात आली होती, पण अहवाल अजून माज्याकडे आला नाही. हा अहवाल सार्वजनिक केला पाहिजे. जे आरोपी आहेत, जे पैसे वाटपासाठी आले होते, ते आजही मोकाट फिरत आहेत. त्यांनी कोणतीही शिक्षा भोगली नाही. त्यांनी स्पष्ट केले की, जर योग्य कारवाई झाली नाही, तर ते न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार आहेत. निवडणूक आयोगालाही कोर्टात खेचणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

या भयंकर आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर, मतदार आणि स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मतदान करायला आलो होतो, पण अशा प्रकारच्या कारभारामुळे मतदानाची पवित्रता धोक्यात आहे, असे काही नागरिकांनी म्हटले.

काही मतदान केंद्रांवर सुरक्षा वाढवण्याची मागणी केली गेली आहे. निवडणुकीच्या पारदर्शकतेसाठी आणि जनतेच्या मताच्या सुरक्षेसाठी या प्रकाराची तात्काळ चौकशी व निर्भिक कारवाई होणे गरजेचे आहे.

**प्रक्रिया पारदर्शक आहे का?**

सध्या पोलिसांनी कार जप्त केली असून तपास सुरू आहे; मात्र आरोपींवर अजूनपर्यंत एफआयआर नाही, त्यामुळे पुढील कायद्याच्या मार्गाने कसे हाताळले जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. मालवणमधील ही घटना मतदारांना प्रक्रिया पारदर्शक आहे का? याकडे लक्ष वेधत आहे. त्या पार्श्वभूमीवर राजकीय आणि प्रशासनिक कारवाई काय होतो? याकडे लक्ष लागले आहे.

## देशात मनमानी सुरू! चिंता वाढली आहे..


राज ठाकरे, रोहित पवार संतापले

देशात मनमानी सुरू आहे, अशा 4 शब्दांत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मंगळवारी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा निकाल 21 डिसेंबरपर्यंत लांबणीवर टाकण्याच्या निर्णयावर संताप व्यक्त केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनीही या प्रकरणी चिंता व्यक्त केली आहे. उच्च न्यायालयाचा आजच्या निकालाने निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारावर शिक्कामोर्तबच झाले आहे, असे ते म्हणाले.

नागपूर खंडपीठाने मंगळवारी एका याचिकेवर सुनावणी करताना उद्याची मतमोजणी २१ तारखेपर्यंत लांबणीवर टाकली. कोर्टाच्या या निर्णयामुळे आता राजकीय पक्षांकडून संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. राज ठाकरे यांनी केवळ ४ शब्दांत या निकालाचा समाचार घेतला आहे. देशात मनमानी सुरू आहे, असे ते म्हणालेत.

त्यांच्यानंतर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनीही या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त केला आहे. रोहित पवार म्हणाले, राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतीची मतमोजणी ही ३ डिसेंबरऐवजी २१ डिसेंबर रोजी एकत्रित करण्याच्या न्यायालयाच्या निर्णयाने चिंता वाढली आहे. २१ डिसेंबरपर्यंत सर्वांनाच खूप काळजी घ्यावी लागणार आहे.

आज उच्च न्यायालयाने निकाल पुढे ढकलण्यासंदर्भात दिलेला निकाल म्हणजे निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारावर केलेलं शिक्कामोर्तबच आहे. या निर्णयाबाबत मुख्यमंत्र्यांनी नापसंती व्यक्त केली असली तरी निवडणूक आयोग पक्षाच्या दावणीला बांधला तर हेच होणार, हे मुख्यमंत्र्यांनी विसरू नये. राज्यात आज जो काही गोंधळ निर्माण झाला आहे त्यासाठी निवडणूक आयोगासह भाजपादेखील तेवढीच जबाबदार आहे, असे ते म्हणालेत.

रोहित पवार यांनी यावेळी बुलढाण्यात शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्या मुलाने बोगस मतदारांना पळवून लावण्याच्या घटनेवरही संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणी निवडणूक आयोगाला धारेवर धरले आहे. ते म्हणाले, आम्ही सातत्याने आयोगाला दुबार मतदारांबाबत कठोर उपाययोजना करण्याची विनंती करत होतो पण आयोगाकडून याची कसलीही दखल घेतली गेली नाही. आता तर सत्ताधारी आमदारच दुबार मतदारांच्या माध्यमातून निवडणूक प्रक्रियेत घोळ घालण्याचे काम करत आहेत.

बुलढाण्यात बोगस मतदाराला स्थानिकांनी पकडले असते मात्र बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांच्या मुलाने व पुतण्याने पोलिसांशी हुज्जत घालून बोगस मतदाराला पळवून लावले. सत्ताधारी लोक सातत्याने बोगस मतदारांच्या माध्यमातून निवडणुक प्रक्रिया प्रभावित करत असून आयोग मात्र झोपा काढत आहे, असा सणसणीत टोला आमदार रोहित पवार यांनी लगावला.

## किशोर तिवारींना ५ कोटींची नोटीस



■ मुंबई: एका इंग्रजी वृत्त वाहिनीवरील चर्चेत तापलेल्या वातावरणात झालेले शब्दांचे युद्ध आता थेट न्यायालयाच्या दारात पोहोचले आहे. भाजपाचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी सामाजिक कार्यकर्ते किशोर तिवारी यांना तब्बल पाच कोटी रुपयांची बदनामीची नोटीस बजावली असून, सात दिवसांत त्याच चॅनेलवरून बिनशर्त माफी मागा असे स्पष्ट आदेशच देण्यात आले आहेत.

१ डिसेंबरच्या चर्चेत दोघेही पॅनेलिस्ट म्हणून उपस्थित होते. यावेळी तिवारी यांनी पाठक यांच्यावर जोरदार आरोपांचा भडिमार करत, ते भाजपाचे प्रवक्तेच नाहीत, ते कोल माफियाचे प्रतिनिधी आहेत, तसेच भ्रष्टाचारात गुंतलेले आहेत, अशा मालिकाच चालवली. इतकेच नव्हे तर भाजपावर निशाणा साधताना महायुतीला महालूटयुती असे संबोधून पाठक यांनाही त्यात ओढले.

या सर्व वक्तव्यांना असत्य, मनमानी आणि हेतुपुरस्सर बदनामी असा ठपका ठेवत पाठक यांच्या वकिलांनी २ डिसेंबर रोजी अधिकृत नोटीस बजावली. तिवारी यांनी सात दिवसात सार्वजनिकरीत्या माफी मागावी, अन्यथा पाच कोटींची नुकसानभरपाई वसूल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. त्याचबरोबर दिवाणी आणि फौजदारी कारवाईची तयारीही नोटिशीत स्पष्टपणे नोंदवण्यात आली आहे.

## कोकणात गाड्यांवर दगडफेक

### रिव्हॉल्व्हर दाखवण्यात आल्याचा दावा

■ रायगड : जिल्ह्यातील महाड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आज मतदान होत असताना सकाळीच परिस्थिती बिघडली. नवे नगर परिसरात मतदान सुरू असताना अचानक गोगावले आणि सुशांत जाबरे यांच्या समर्थकांमध्ये जोरदार वाद सुरू झाला. हा वाद काही क्षणांतच हिंसाचारात रूपांतरित झाला.

दोन्ही गटांनी एकमेकांशी ढकलाढकली केली, ओरडाओरड झाली आणि लगेचच मारहाण सुरू झाली. सुशांत जाबरे आणि त्यांच्या अंगरक्षकाला गंभीर मारहाण करण्यात आली असल्याचे समोर येत आहे. त्या ठिकाणी उपस्थित सामान्य मतदार घाबरले आणि अनेकांनी मतदान केंद्राबाहेर पळ काढला. शांततेत मतदान होण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत असताना अशा प्रकारचा हिंसाचार उफाळून आल्याने मतदारांचा आत्मविश्वास ढासळल्याचे स्पष्टपणे दिसले.

## जतमध्ये पोलिसांसोबत वादावादी

■ सांगली : जतमध्ये मतदान केंद्रावर भाजप कार्यकर्ते व पोलिसांमध्ये वादावादी झाल्याचे समोर येतेय.शिवाजी पेठेतील शाळा क्रमांक एक येथील मतदान केंद्रावर हा प्रकार घडला. भाजपाच्या प्रभाग ५ मधील उमेदवार प्रणिता यादव यांना मतदान केंद्रा बाहेर काढले. त्यामुळे यादव समर्थक आक्रमक झाले. त्यांनी मतदान केंद्रात धाव घेत पोलिसांशी वाद घातला. पोलिस उपाधीक्षक सचिन थोरबोले यांनी आक्रमक कार्यकर्त्यांची समजूत घालून त्यांना शांत केले.

## बोगस मतदार पकडले

■ जळगाव : जिल्ह्यातल्या जामनेरमध्ये एका बोगस मतदाराला पकडण्यात आले. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी या मतदाराला पकडले. प्रभाग क्रमांक दहामधील एकलव्य शाळेतील मतदान केंद्रावर हा प्रकार घडला.

दुसरीकडे, शिर्डी नगरपरिषद निवडणुकीत बोगस मतदान झाल्याचे समोर आले आहे. शोभा शिंदे या मतदानासाठी गेल्या होत्या. तेव्हा त्यांचे मतदान अगोदर झाले असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे त्यांचे मतदान कोण केले, असा सवाल आता विचारला जात आहे. येथे बोगस मतदान झाल्याचा आरोप होत आहे.

## बुथवरून तुफान राडा!

■ मुंबई : बदलापूरमध्ये निवडणुकीची रणधुमाळी अक्षरशः रस्त्यावर उतरत असून, बुथ लावण्यावरून भाजप-शिवसेना कार्यकर्त्यांत तुफान राडा उसळल्याची घटना समोर आली आहे. पश्चिम गांधी नगर टेकडी परिसरातील एसटी बसस्टँडजवळ मतदारांना स्लिप वाटण्याच्या ठिकाणी दोन्ही गट आमनेसामने आले आणि क्षणात वातावरण तापले. पहिले किरकोळ वाद, मग जोरदार ढकलाढकली आणि त्यानंतर हातघाई–अशा क्रमाने वाढत गेलेल्या तणावामुळे बसस्टँड परिसर अक्षरशः रणांगण बनला. लोकांची धावपळ उडाली, दुकाने बंद झाली आणि परिसरात गोंधळाचे चित्र निर्माण झाले. तणाव वाढू लागल्याने पोलिसांना पळत-पळत घटनास्थळी धाव घ्यावी लागली. काही वेळातच मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आणि दोन्ही गटांना वेगळे करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली.

या राड्यात दोन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून चौकशी सुरू आहे. मात्र मतदारांना स्लिप वाटणे आणि बुथ उभारणीवरून एवढा मोठा संघर्ष उसळल्याने स्थानिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पुढे अजून काय घडते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## धनंजय मुंडेंची हत्या होणार होती

### आमदाराच्या दाव्याने महाराष्ट्रात खळबळ



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २ :
माजी मंत्री आणि राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांची हत्या झाली असती पण ते वाचले असं विधान राष्ट्रीय समाज पक्षाचे गंगाखेडचे आमदार रत्नाकर गुट्टे यांनी केले आहे.

आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या या विधनामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. धनंजय मुंडे यांचा इंदोर मध्ये खून होणार होता पण दिवंगत भय्यूजी महाराज यांच्यामुळे ते वाचले असं त्यांनी भाषणात म्हटलं आहे.

धनंजय मुंडे दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उर्मिला केंद्रे यांच्या प्रचारासाठी गंगाखेड येथे आले होते. त्यावेळी त्यांनी आमदार रत्नाकर गुट्टे यांच्यावर कडाडून टीका केली होती. आमदार गुट्टे यांनी शेतकऱ्यांच्या नावावर सोळाशे कोटी रुपयांचे कर्ज उचलले असल्याचा आरोप धनंजय मुंडे यांना केली होता. याला आता आमदार गुट्टे यांनी उत्तर दिले आहे.

गंगाखेडमधील भाषणात बोलताना आमदार गुट्टे यांनी म्हटले की, तुम्ही सुरुवात केली आहे पण शेवट मी करणार आहे. तुम्ही मला २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पाडण्याचा प्रयत्न केला, तुम्ही माझ्या विरोधात कोणाकोणाला उमेदवारी दिली त्यांच्यासाठी किती ताकद लावली हे देखील मला माहित आहे. पण माझी गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील जनता हीच माझं बुलेटप्रूफ जॅकेट आहे त्यामुळे माझा पराभव होऊ शकला नाही, की मी प्रचंड मताधिक्याने विजयी झालो. मी राजा आहे, मी कोणत्याही पक्षाच्या स्टेजवर जाऊ शकतो. मी त्या पक्षांच्या स्टेजवर जाईन पण धनू भाऊ तुमचा निकाल लावल्याशिवाय राहणार नाही.

गुट्टे म्हणाले की, धनू भाऊ मागील काही वर्षात तुमच्यावर बरेच आरोप झाले, प्रत्येकजण तुमच्या विरोधात बोलत होता. पण मी कधीच तुमच्या विरोधात एकही शब्द काढला नाही पण तुम्ही आता स्वतःहून गंगाखेडला आलात आणि माझ्या विरोधात बोललात त्यामुळे आता मी तुमच्या विरोधात बोलल्याशिवाय राहणार नाही. तुमचं सर्वच बाहेर काढणार आहे, असेही रत्नाकर गुट्टे म्हणाले.

## सहलीहून परतणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बसला अपघात

### नाशिकचे ४० हून अधिक विद्यार्थी जखमी



■ वृत्तसंस्था, सातारा, दि. २ :
कोकणात सहलीसाठी गेलेल्या नाशिकमधील विद्यार्थ्यांच्या बसला नाशिकला जाताना पुणे-बंगळूरू महामार्गावर कराड तालुक्यातील वाठार गावच्या हद्दीत भीषण अपघात झाला. महामार्गावर काम सुरू असलेल्या सहलीची बस भराव पुलावरून कोसळून बसमधील ४० हून अधिक विद्यार्थी जखमी झाले आहेत. त्यात चार विद्यार्थी गंभीर जखमी आहेत. जखमींना कराडच्या कृष्णा रूग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

नाशिकच्या निफाडमधील बी. पी. महाविद्यालयाचे विद्यार्थी सहलीसाठी कोकणात गेले होते. कोकणातून सातारामार्गे नाशिकला परत जात असताना पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी पहाटे बसचा अपघात झाला.

वाठार (ता. कराड) गावच्या हद्दीत भराव पुलाचे काम सुरू आहे. पहाटे अंधार होता. त्यामुळे बस चालकाला रस्त्याच्या परिस्थितीचा अंदाज न आल्याने बस भराव पुलावरून खाली कोसळली. या अपघाताची माहिती मिळताच विद्यार्थ्यांचे पालक भयभीत झाले. अपघाताची माहिती घेण्यासाठी पालक कराड पोलिसांशी संपर्क साधत होते.

या अपघातात बस मधील ४० हून अधिक विद्यार्थी जखमी झाले आहेत. त्यातील ४ विद्यार्थी गंभीररित्या जखमी असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. सर्व जखमी विद्यार्थ्यांना कराडच्या कृष्णा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच कराड ग्रामीण आणि महामार्ग मदत केंद्राच्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वाठार ग्रामस्थांनी पोलिसांना मदत केली.

या अपघातात एकूण ४२ विद्यार्थी जखमी आहेत. त्यापैकी १० जणांना वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात आणि ३२ जणांना कृष्णा रूग्णालयात दाखल करण्यात आले.

४ विद्यार्थी गंभीर जखमी असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. हे सर्व विद्यार्थी निफाडमधील बी. पी. महाविद्यालयाचे आहेत. दरम्यान, मुली देखील सहलीला गेल्या होत्या. सुदैवाने त्यांची दुसरी बस होती. त्यामुळे त्या सुरक्षित आहेत.

## न्यायालयाच्या आदेशावर उद्धव ठाकरेचा खोचक वार!



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांचा निर्णायक क्षण जणू हाताच्या अंतरावर आला होता. उद्या ३ डिसेंबरला निकाल जाहीर होणार आणि त्याचवेळी धक्का! मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सर्व निकाल २१ डिसेंबरपर्यंत थांबवण्याचे आदेश दिले. एका क्षणात वातावरणात तणाव, उमेदवारांच्या छातीत धडधड आणि राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात.

या गोंधळात सर्वांचं लक्ष एका प्रतिक्रियेवर खिळलं–शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर. पक्षप्रवेश कार्यक्रमानिमित्त मातोश्रीवर पत्रकारांनी निकालावरील स्थगनाबद्दल विचारलं. यावर उद्धव ठाकरे यांनी एका वाक्यातच राजकीय तापमान वाढवलं.

निवडणूक आयोग आणि न्यायालय यावर न बोलेलंच चांगलं! एवढाच पण अचूक, खोचक वार! मातोश्रीवर चाललेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात अनेक कार्यकर्त्यांनी शिवबंधन बांधून ठाकरे गटात दाखल होताना उत्साह शिगेला पोहोचला होता. परत येणाऱ्यांचे स्वागत आहे, असे सांगत उद्धव ठाकरेंनी पक्षात पुन्हा येणाऱ्या शिवसैनिकांना खुले आमंत्रण दिले. धुळफेक झालेले, कट्टर शिवसैनिक परत येतात, हेच आमचं बळ आहे, अशीही त्यांनी समाधानाची नोंद केली.

उद्धव ठाकरे म्हणाले, जशी हवा प्रदूषित होते तसंच राजकारणही झालंय! दगाबाज भाजपला धडा शिकवण्यासाठी महाविकास आघाडी उभी केली. सत्ता मिळवण्यासाठी सगळी लाचारी चालली आहे. माझ्या नावाने धुळफेक केली, शिव्या दिल्या आणि आज तेच लोक सोनिया गांधींसोबत फोटो काढतायत. अजित पवार निधी देत नाहीत, अशी कारणं देऊन ठाण्यात गोंधळ घातल्याचे ते म्हणाले.

## खगोलीय घटनांचा नवा बहर




■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २ :
सन २०२५ या वर्षाच्या अखेरच्या महिन्यात निसर्गासोबत आकाशातही विविध खगोलीय घटनांचा नवा बहर अनुभवण्याची संधी खगोलप्रेमींसाठी उलपब्ध आहे. त्यामुळे हा अनुभव घेण्यासाठी प्रत्येकाने सज्ज व्हावे, असे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले आहे. वर्षातील शेवटच्या या महिन्यात सुपर मून बघण्याची संधी खगोल प्रेमींना उपलब्ध झाली आहे. तसेच इंटरनॅशनल स्पेस स्टेशनही पाहता येणार आहे.



सध्या स्थितीत सूर्य वृश्चिक राशीतील लाल रंगाच्या ज्येष्ठा नक्षत्रात तर रात्रीच्या प्रारंभी पूर्व आकाशात वृषभ राशीतील ठळक तारका रोहिणी नजरेस पडणार आहे. आकाश मध्याशी मीन राशीतील शनी ग्रह पाहता येणा आहे. रात्री साडेआठच्या सुमारास पूर्व आकाशात मृग नक्षत्र आणि एका तासांनी मिथुन राशीतील गुरु ग्रह व पहाटे गुलाबी थंडीत पूर्वेस बुध आणि शुक्र पहता येणार आहे.

जगातील १६ देशांच्या संयुक्त प्रयत्नातून साकारलेले महाकाय आकाराचे इंटरनॅशनल स्पेस स्टेशन अर्थात (अंतराळ संशोधन प्रयोगशाळा) दर २८ हजार हजार कि.मी. एवढ्या प्रचंड वेगाने केवळ दीड तासात एक पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण करताना ज्या मार्गाने फिरते त्या भागातील लोकांना ते नुसत्या डोळ्यांनी पाहता येते. अशी ही फिरती चांदणी २ ते ५ डिसेंबर या सलग चार दिवसांत संध्याकाळी पाहता येणार आहे. ताण कमी करा; दोड यांचे आवाहन दिवसभरातील तणाव कमी करण्यासाठी या हेमंतातील वसंत बघता येईल.अधिक माहितीसाठी विश्वभारती सदैव सज्ज असेल, असे विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांचे म्हणणे आहे.

इच्छुकांना याचा लाभ विश्वभारती केंद्रावर ३ ते ५ रोजी विनामूल्य घेता येईल. ३ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६.२२ ते ६.२८ या वेळेत उत्तरेकडून पूर्वेकडे जाताना ६.२६ ला चंद्राजवळ दिसेल. ४ डिसेंबर रोजी ७.११ ते ७.१६ या वेळेत पश्चिमेकडून दक्षिणेकडे जाईल.

५ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६.२३ ते ६.२९ या वेळेत वायव्य आकाशातून दक्षिणेकडे जाताना ६.२८ वाजता शनी ग्रहाच्या खाली दिसेल. दिवसभरातील ताण तणावातील भार कमी करण्यासाठी या हेमंतातील वसंत बघता येईल म्हणून काहीशी उसंत घेऊन आकाश संगतीला पसंत करावे, असे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रभाकर दोड यांनी केले आहे.

## सत्ताधारी राष्ट्रवादी - भाजपचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले

### गेवराईत निवडणुकीला हिंसक वळण : दगडफेकीनंतर पोलिसांचा लाठीचार्ज



■ वृत्तसंस्था, बीड, दि. २ :
राज्यात सर्वत्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निडवणुकीचे मतदान शांततेत सुरू असताना बीडमध्ये मात्र या निवडणुकीला गालबोट लागले. बीडच्या गेवराईत सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपच्या समर्थक एकमेकांपुढे उभे टाकले. त्यातून झालेल्या वादातून त्यांनी एकमेकांवर दगडफेक केली. यामुळे येथे मोठा तणाव निर्माण झाला आहे. सध्या शहरात तणावपूर्ण शांतता आहे.

गेवराई नगरपालिकेसाठी नगरपालिकेसाठी मतदान सुरू असताना दुपारी अचानक सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पंडित गट व भाजपच्या लक्ष्मणराव पवार गटात तणाव निर्माण झाला. त्यानंतर या दोन्ही गटांनी हातघाईवर येत एकमेकांवर दगडफेक केली. त्यात लक्ष्मणराव पवार यांच्या घरापुढे दगडफेक करण्यात आली. तसेच गाड्यांच्या काचाही फोडण्यात आल्या. यावेळी खबरदारी म्हणून पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला.

या घटनेची माहिती मिळताच बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी घटनास्थळी धाव घेऊन स्थितीचा आढावा घेतला. सध्या शहरात तणावपूर्ण शांतता आहे. संवेदनशील ठिकाणी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, गेवराईच्या मोंढा नाका परिसरात पवार - पंडित यांच्या पुतण्यांमध्ये बाचाबाची झाली. माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे पुतणे शिवराजे पवार व विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांचे पुतणे पृथ्वीराज पंडित यांच्यात बाचाबाची झाली. पोलिसांना त्याची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. यावेळी दोन्ही पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते एकमेकांसोबत भिडले.

दुसरीकडे, अमरसिंह पंडित यांनी या घटनेसाठी विरोधकांना जबाबदार धरले आहे. ते म्हणाले, मला मागील दोन-तीन दिवसांपासून याची कुणकुण लागली होती. शांततेत सुरू असणाऱ्या निवडणुकीत अशा प्रकारच्या घटना घडवून विरोधक लोकांच्या मनात दहशत निर्माण करण्याचे काम करणार हे मला ठावूक होते. कारण, त्यांनी या निवडणुकीत विकासाच्या मुद्यावर एकही शब्द बोलला नाही. त्यांचे म्हणणे एकच होते की, निवडणुकीच्या निकालात कळेल की आम्ही काय केले? आम्ही १८ वर्षांचा हिशेब मागत होतो. पण ते काहीच बोलत नव्हते. विजयसिंह यांनी आमदार झाल्यानंतर एका वर्षात भरपूर विकासकामे केली.

विकासाच्या मुद्यावरून लोकांची दिशाभूल करून त्यांचे लक्ष दुसरीकडे घेऊन जाण्याचा हा प्रयत्न होता. मतदान अतिशय शांततेत सुरू आहे. मतदान जवळपास ५० टक्क्यांवर गेले आहे. सकाळच्या घटनेनंतर शहरात कुठेही काही घडले नाही. मतदार बाहेर येत आहेत. लोकांनी कुणाच्याही दहशतीला बळी न पडता आपला मतदानाचा हक्क बजवावा, असे ते म्हणालेत.

दुसरीकडे, बीडच्या परळीत बोगस मतदानाचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# मुर्तिजापूर येथे सिद्धार्थ विद्यालय मतदान केंद्रावर किरकोळ वाद

**मूर्तिजापूर :** अकोल्याच्या मूर्तिजापूर येथील नगर परिषद निवडणुकीच्या प्रभाग क्रमांक १० मधील सिद्धार्थ विद्यालय मतदान केंद्रावर वंचित बहुजन आघाडी व भाजपाचे उमेदवारांमध्ये तू-तू, -मै झाल्याची घटना घडली. वेळीच पोलिसांनी हस्तक्षेप केल्याने वाद मिटला. मै मतदान केंद्रावर भाजपचे उमेदवार आपली मनमानी करत कार्यकर्त्यांसम वेत खुलेआम फिरत असल्याचा आरोप यावेळी वंचित बहुजन आघाडीचे प्रभाग क्रमांक १० उमेदवार शेखर येडवर व मंजुषा नितीन टाले यांनी केंद्राची पाहणी करण्याकरिता आलेल्या अपर जिल्हा पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी यांच्या पुढे करतअसतानाच अचानक भाजपचे उमेदवार प्रज्ञा निलेश वानखडे यांचे पती निलेश वानखडे येऊन वंचितचे उमेदवार 'चोंबळेपणा' करत असल्याचे बोलत वंचित व भाजप च्या उमेदवारांमध्ये किरकोळ वाद निर्माण झाला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून वाद मिटवला व दोन्ही पक्षाच्या उमेदवारांना केंद्रस्थानापासून दूर जाण्यास सांगितले. मात्र या घटनेमुळे प्रभाग क्रमांक १० च्या सिद्धार्थ विद्यालय मतदान केंद्रावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले



मतदान केद्रावर स्वता दिव्यांग असलेले बाळासाहेब नेरकर दिव्याग म्हातारीला मतदान केद्रावर मतदाना साठी नेताना



## हिवरखेड येथे अदांजे ७४ टक्के मतदानाचा अदांज

हिवरखेडमध्ये नव्यानेच आज मतदान झाले असून यामधे दहाप्रभागात वीस बुथ रचना होती या मधे काही मतदान केद्रावर मतदान वेळेनूसार आत मधे मतदार घेऊन त्यांच्या लाईनी लागलेल्या होत्या त्यामूळे बातमी लीहेस्तोवर पुर्ण टक्केवारी येणे बाकी होतेयामधे मतदान अती ऊत्साहाने मतदान होने करीता राष्टीय कर्त्यव्य म्हनून एक हात व पायाने दिव्याग असलेले बाळासाहेब नेरकर यांनी एका दिव्यांग आजीस काखेत नेऊन मतदान करुन घेतले व काहीना घरा पासून खुर्चीवर बसलेल्या आजीबाइला सूद्धा मतदान केद्रावर मतदान करून घरापर्यत सोडवुन दिले.

# सर्व नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला

## मतदानोत्तर चाचण्यांच्या निष्कर्षांना २० डिसेंबरपर्यंत बंदी

**अकोला,दि २ (प्रतिनिधी) :** राज्यातील सर्व २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान संपल्याच्या पुढील अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगानेही संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.मतदान यंत्रांची हातळणी काळजीपूर्वक करण्यात यावी. मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोदामांसाठी २४ तास चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करावी. सुरक्षा उपकरणे (उदा. गोदाम ाच्या प्रवेद्वाराबाहेरील सीसीटीव्ही, सुरक्षा आलार्म सिस्टीम, अग्निशमन यंत्रणा इ.) व्यवस्थित कार्यान्वित असल्याची खात्री करून घ्यावी.

राजकीय पक्षांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना गोदामांबाबत आणि तिथल्या सुरक्षा व्यवस्थेबाबत अवगत करावे. त्याचबरोबर निवडणूक लढविणारे उमेदवार अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींना गोदाम ाचे प्रवेशद्वार दिसेल अशा ठिकाणी बसण्यासाठी जागा निश्चित करून द्यावी, असेही निर्देश राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.राज्यातील २६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान झाले; तसेच सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि ७६ नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी आता २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून मतमोजणी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



**अंकुश ठक, बार्शिटाकळी (नवरदेवाने आधी केले मतदान) : लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यासाठी आज संपूर्ण राज्यात मतदानाचा माहोल पाहायला मिळाला. राज्यघटनेने दिलेल्या मतदानाच्या अधिकाराचे महत्व जाणून मतदारांनी उत्साहात मतदान केंद्रांकडे धाव घेतली.अशाच कर्तव्यनिष्ठ भूमिकेचे उत्तम उदाहरण बार्शीटाकळी येथे पाहायला मिळाले. येथे अंकुश ठक यांनी आपल्या आयुष्यातील अत्यंत खास दिवशी , लग्नाच्या दिवशी पहिले पाऊल मतदान केंद्राकडे टाकले. बोहल्यावर चढण्यापूर्वीच त्यांनी मतदान करून लोकशाहीप्रती आपली निष्ठा दाखवली. (सौजन्य : जयेश जगड, अकोला )**



**मुर्तिजापूर : मुर्तिजापूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत शशिकला जोशी या ९२ वर्षांच्या आजींनी म तदान केंद्रांवर येऊन आपला मतदानाचा हक्क बजावला.**



**अकोट : शहरात सरस्वतीदेवी अग्रवाल या १०५ वर्षाच्या आजींनी आपला मतदानाचा हक्क बजावला. अकोटमधील प्रभाग क्रमांक सातसाठी शिवाजी विद्यालयातील मतदान केंद्रावर त्यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. स्वातंत्र्यानंतरच्या सर्व निवडणुकीत या आजींनी आपले मतदान केले आहे**

# २५ व २६ जानेवारीला १२ वे राज्यस्तरीय राष्ट्रसंत विचार साहित्य

**अकोला,दि २ (प्रतिनिधी) :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा १२ वे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन स्थानिक जानोरकर मंगल कार्यालय रिंग रोड, अकोला येथे २५ व २६ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित केले असून, या संमेलनाच्या आयोजनास एक तप पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने या दोन दिवसीय संमेलनातील संपूर्ण सत्र व परिसंवाद तसेचसहभागी साहित्यिक, अभ्यासक, प्रबोधनकार वक्ते, गायक, दर्जेदार असावेत, असेही नुकत्याच संपन्न झालेल्या आयोजन समितीच्या बैठकीत ठरले आहे. त्याचप्रमाणे शालेय तसेच महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना विविध स्पर्धे च्या माध्यमातून संधी देण्यात येणार आहे. या १२ व्या राज्यस्तरीय विचार साहित्य संमेलनामध्ये राज्यभरातून साहित्यिक, वक्ते. अभ्यासक यांना निमंत्रित करण्यात



येणार आहे. संमेलनातील संपूर्ण कार्यक्रम आयोजन समिती अकोला जिल्हा यांच्या माध्यमातून ठरविण्यात येणार आहेत. हे साहित्य संमेलन शिस्तबद्ध पार पडावे याकरिता सर्व गुरुदेव प्रेमी, सेवक तसेच प्रचारक, साधक यांनी सहकार्य करावे, असे आयोजन समितीच्या वतीने डॉ. रामेश्वर बरगट, गोपाल गाडगे, ज्ञानेश्वर साकरकार, श्रीकृष्ण ठोंबरे, राजेंद्र झामरे, मंगेश कराळे, चंद्रशेखरचतारे, नागेश घोगरे, श्रीकृष्ण पखाले, डॉ. रामेश्वर लोथे, अजय कनसरे, प्रल्हाद निखाडे, गजानन ठाकूर, योगेश खोडे, सचिन माहोकार, चंद्रशेखर साबळे, मयूर वानखडे, राजेश गावंडे, सुशांत निलखन यांच्या वतीने विनंती करण्यात येत आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या राष्ट्रीय सामाजिक प्रगल्भ विचारांच्या या प्रचार चळवळीमध्ये समाजासाठी काम करणाऱ्या संघटना व संस्थांचासुद्धा सहभाग घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रसंत विचार साहित्य संघाकरिता इच्छुक व निःस्वार्थ भावनेने सेवा करणाऱ्या युवक, युवती तथा सेवाभावी कार्यकर्ते यांची नोंदणीसुद्धा लवकरच सुरु करण्यासाठी ऑनलाइन व्यवस्थासुद्धा राहील.

# प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी

**अकोला,दि २ (प्रतिनिधी) :** आक्रमण संघटनेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही महामानवाला बहुजन समाजाची भावपूर्ण आदरांजली या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन ६ डिसेंबर २०२५ रोजी अशोक वाटिका अकोला या ठिकाणी सकाळी ९ ते रात्री १० वाजे पर्यंत आयोजीत करण्यात आले आहे.

सकाळी धम्म वंदना व बिगुलवर मानवंदना नंतर शब्दसुमनानी आदरांजली यात डॉ विलास आठवले विधान मंडळ सचिव,मुंबई, प्रो डॉ संतोष हुशे, शौकत अली मीर साहेब, पुरूषोत्तम आवारे पाटील, सिद्धार्थ देवदरिकर, डॉ अभय पाटील, खुरेन्द्र तिडके, प्रा चंदू शिरसाट, गजानन कांबळे, सुरज मेश्राम हे उपस्थित असुन नंतर शिक्षण हे देशाचे भविष्य आहे. पण या कार्यक्रमात प्रा मंगेश भुताडे वाशीम, आनंद साधु , जयदीप सोनखासकर, शशिकांत गायकवाड, मनोज इंगळे, नयन गायकवाड, सचिन तिडके उपस्थित राहणार असुन नंतर भारतीय संविधान व आजची स्थिती व संविधानिक मूल्ये या सत्रात अँड वैष्णवी हागोने, प्रा प्रमिला बोरकर, सौ शितल राऊत, रोशन सरदार, जगदीश मानवटकर, शरद इंगोले, आकाश शिरसाट उपस्थित असुन सायंकाळी संगीतमय आदरांजली महाराष्ट्राचे ख्यातनाम सुप्रसिद्ध गायक संविधान मनवरे व संच सोबत डॉ पत्रलेखा दास गुल्हाने व डॉ अलकेश गुल्हाने उपस्थित राहतील. या कार्यक्रमात महेंद्र भोजने अध्यक्ष, (फुले आंबेडकरी विद्यार्थी संघटना), शंकर कंकाळ (अध्यक्ष अभ्यासिका महाराष्ट्र) उमेश इंगळे (सामाजीक कार्यकर्ते), पंकज वाढवे (शहर अध्यक्ष अनु जाती कॉंग्रेस अकोला) , शिलवंत डोंगरे (बुध्दविहार समन्वयक समिती), संजय वानखडे (अध्यक्ष, छत्रपती बार फेडरेशन अकोला), अॅड. आकाश हिवराळे (जिल्हा अध्यक्ष बहुजन विद्यार्थी परिषद), शिलवंत वानखडे (जिल्हा अध्यक्ष समाज क्रांती आघाडी) आदि सहभागी होणार आहेत.त्यामुळे या कार्यक्रम ाला सर्व नागरिकांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन या कार्यक्रमाला सह परिवार उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा अध्यक्ष सुरज मेश्राम यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे केले आहे.

## थोडक्यात

### कारागृह चौकातील निवाऱ्याची दुरवस्था

**अकोला :** शहरातील कारागृह चौकातील प्रवासी निवाऱ्याची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. हिवाळ्यामुळे सध्या सर्वत्र हवेतील गारव्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नोकरी, व्यवसाय, शिक्षणानिमित दररोज बाहेरगावी जाणे येणे करणाऱ्या प्रवाशांना उघड्यावर एसटी बसची वाट पाहात थांबावे लागते. परिणामी नागरिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या प्रवासी निवाऱ्याच्या एका भिंतीला तडा गेला आहे. त्यामुळे ती भिंत कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय या निवाऱ्यात मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता पसरली आहे.

### कोतवाल बुकाची नक्कल आता ऑनलाइन!

**अकोला :** नागरिकांना कोतवाल बुकची नक्कल तत्काळ व सुलभ पद्धतीने मिळावी, यासाठी ऑनलाइन ॲप्लीकेशन विकसित करण्यात आले आहे. नागरिकांनी संबंधीत लिंकचा वापर करून ऑनलाइन अर्ज करावा व नक्कल प्राप्त करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. तसेच, ज्या नागरिकांची कोतवाल बुक नोंद पोर्टलवर उपलब्ध नसेल, त्यांनी संबंधित तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षात प्रत्यक्ष भेट देऊन नोंद मिळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### विशेष रेल्वे गाड्यांच्या फेऱ्यांचा विस्तार

**अकोला :** प्रवाशांच्यासुविधेसाठी व वाढत्या प्रवास मागणीची पूर्तता करण्याच्या उद्देशाने रेल्वेद्वारे विशेष गाड्यांच्या फेऱ्यांचा विस्तार करण्यात आला आहे. या गाड्या आता २५ डिसेंबर ते २ जानेवारीपर्यंत धावणार आहेत. काही दिवसांपासून मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातर्फे प्रवाशांसाठी उत्सवाच्या निमित्ताने विशेष गाड्यांची घोषणा केली होती. यात राजकोट-महबूबनगर आणि ओखा- मदुराई या मार्गांदरम्यान विशेष भाड्याने उत्सव विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला होता.

# कृउबास परिसरात सोयाबीन खरेदी केंद्र तत्काळ सुरु करा

बाळापूर : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात सोयाबीनचे शासकीय हमीभाव केंद्र सुरू करून तत्काळ सोयाबीन खरेदी करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रीय किसान मोर्चा बाळापूरच्यावतीनेतालुका तहसीलदार वैभव फरतारे यांना निवेदन दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शासनाचे हमीभाव खरेदी केंद्र अद्याप सुरू न झाल्यामुळे व्यापारी वर्गाकडून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात असून, अत्यंत कमी भावात सोयाबीन घेतल्या जात आहे. अहोरात्र मेहनती करून शेतमाल तयार केल्यानंतर त्यास योग्य भाव मिळणे गरजेचे असताना शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याने तत्काळ हमी भाव खरेदी केंद्र सुरू करण्यात यावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. या निवेदन देतेवेळी राष्ट्रीय किसान मोर्चाचे श्याम अवचार, गजानन जंजाळ, गजानन वाकोडे, विजेंद्र वानखडे, सतीश अवचार आदींसह शेतकरी उपस्थित होते.

## श्री गुरू तेग बहादूर यांचे ३५० वे शहिदी समागम वर्ष

# शहरात बुधवारी मोटरसायकल रॅलीचे आयोजन

**अकोला,दि २ (प्रतिनिधी) :** 'हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर' यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त ७ डिसेंबर रोजी नागपूर येथे भव्य कार्यक्रम होणार असून, जिल्ह्यातील शेकडो भाविक नागपूरला जाणार आहेत.

त्यानिमित्त अकोला शहरात उद्या बुधवार, दि. ३ डिसेंबरला दु. २.३० वा. गुरुद्वारा सिंघ सभा येथूनभव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातून शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, वाल्मीकि, मोहयाल, सिंधी आदी समाजबांधव मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी होणार आहेत. रेल्वेस्थानक चौक परिसरातून ही रॅली पुढे जिल्हा न्यायालय, सातव चौक, राऊतवाडी चौक, रतनलाल प्लॉट, नेहरू उद्यान, गोरक्षण रस्ता, पुढे कौलखेडवरून सिंधी कँप, अशोक वाटिका, बसस्थानक, चांदेकर चौक, गांधी चौक, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय अशी जाऊन न्यू राधाकिशन प्लॉट येथे गुरुद्वारा येथे समारोप होणार आहे. अधिकाधिक भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षा ऑनलाइन आवेदनपत्र भरण्यास ८ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**अकोला :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २२ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता ८ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती परीक्षा परिषदेमार्फत देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी ) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इयत्ता आठवी) २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेकरिता शाळा नोंदणी व विद्यार्थी ऑनलाईन आवेदन पत्र भरण्याकरिता ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र आता ८ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ज्या शाळांनी अद्याप ऑनलाईन आवेदनपत्र भरले नसतील त्यांनी नियमित शुल्कासह ८ डिसेंबरपर्यंत शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र आणि शुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे. विलंब शुल्कासह १५ डिसेंबर, अतिविलंब शुल्कासह २३ डिसेंबर तर अति विशेष विलंब शुल्कासह ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ही माहिती भरता येईल. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने आवेदनपत्र भरता येणार नाही, असेही अनुराधा ओक यांनी कळिवले आहे.

# दिव्यांग सक्षमीकरण हाच आमचा ध्यास

**अकोला,दि २ (प्रतिनिधी) :** इसवी सन १९९२ पासून ३ डिसेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्र संघातर्फे अपंगांचा दिवस म्हणून घोषित झालेला आहे.शारीरिक किंवा मानसिक त्रुटी द्वारे विकलांग झालेल्या समाजातील घटकांच्या समस्या समजून घेता याव्यात म्हणून या दिवसाची योजना केली आहे.आपल्या कर्तव्यांची आणि अपंग व्यक्तींच्या हक्कांची आठवण करून देणारा हा दिवस.अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडथळे दूर करणे, आपल्या क्षमतांचा योग्य वापर करून प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देणे,त्याचबरोबर त्यांच्यातील कलागुणांचा साक्षात्कार करून त्यांना जगण्याची उभारी देणे अतिशय महत्त्वाचे आहे.आपण जे करू शकतो ते सर्वकाही ते ही करू शकतात.. म्हणूनच त्यांना सहानुभूतीची नाही तर संधीची गरज आहे. हीच संधी विदर्भात प्रथमच दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला या राष्ट्रीयकृत संस्थेतर्फे उपलब्ध होत आहे. ही संस्था दिव्यांगांच्या शिक्षण ,रोजगार व आरोग्यासाठी संपूर्ण भारतभर आपले कार्य करत आहे*. समाज कल्याण विभागातर्फे



आदर्श संस्था पुरस्कार सदर संस्थेला प्राप्त झाला आहे .आपल्या सभोवताली असलेल्या गरजू दिव्यांग बांधवांना आपण दिव्यांग सोशल फाउंडेशन पर्यंत पोहोचवू शकता, त्यांच्यासाठी सामाजिक व आर्थिक योगदान देऊ शकता.*आपल्या वाढदिवसाला व शुभ प्रसंगी देणगी देऊन संस्थेला मदत करू शकता.या निधीतून दिव्यांग व्यक्तींच्या आवश्यक गरजा पुरवल्या जातात.ज्याद्वारे तो दिव्यांग व्यक्ती स्वयंपूर्ण होऊ शकतो.दर वर्षी संस्थे तर्फे दिव्यांगांना पांढरी काठी ,ब्रेल बुक्स,विल चेअर व शिष्यवृत्ती दिली जाते .दिव्यांग प्रशिक्षण कार्य शाळा घेऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात.अंध विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी वाचक व लेखनिक बँकची निर्मिती करून त्यांच्या साठी विविध शक्षणीक उपक्रम निरंतर राबवले जात आहेत .दिव्यांगाणी तयार केलेल्या शोभिवंत वस्तू व पूजा साहित्याचे प्रदर्शन व विक्री करून दिव्यांगाना स्वयं रोजगाराचे धडे दिले

## बार्शीटाकळी तालुका अध्यक्षपदी अनिल वाहुरवाघ

**अकोला :** अनिल वाहुरवाघ यांना सामाजिक व राजकीय तज्ञ म्हणून सर्वच जनता ओळखत आहे. म्हणून बहुजन समाज पार्टीला संघटीत करण्याच्या उद्देशाने त्यांची बार्शीटाकळी तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. बहुजन समाज पार्टीच्या बार्शीटाकळी तालुका अध्यक्षपदी अनिल वाहुरवाघ यांची नियुक्ती जिल्हाध्यक्ष रमेश इंगळे यांनी बहुजन समाज पार्टीचे प्रभारी माजी खासदार राजारामजी तथा बहुजन समाज पार्टी प्रदेश अध्यक्ष अॅड. सुनिल डोंगरे यांच्या आदेशाप्रमाणे बार्शीटाकळी तालुका अध्यक्षपदी अनिल प्रल्हाद वाहुरवाघ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**(Court Of Shri R.S. Rathore Sir, Gondal)**

**Public Notice for Appearance - Civil Procedure Code (Order 5, Rule 20)**
Hon'ble Third Additional Senior Civil Judge, Gondal, Dist. Rajkot (Gujarat)

**Regular Civil Case No. 58/2021**
**Date of Hearing : 18/08/2025**

**Pravinbhai Damjibhai Thummar**
Partner of Mashhur Mamra Packaging
Resident : Gondal ........**Plaintiff**
:: **Versus** ::
**Mesars Mahmadali Trading Company**
Resident : New Kirana Market, Shop No. E-9,
Akola (Maharashtra), Mobile No. 99223 32784, 98503 61469 ...**Defendant**

This Public Notice is Hereby given to **Mesars Mahmadali Trading Company,** New Kirana Market, Shop No. E-9, Akola (Maharashtra), Mobile No. 99223 32784, 98503 61469, Informing you that the plaintiff has filed the aforementioned **Regular Civil Suit No. 58/2021** against you.

You are hereby ordered to appear for the hearing of this suit on **December 6 2025, at 11:00 AM** in the **Court of the Third Additional Senior Civil Judge, Shri R.S. Rathod Saheb, Gondal, Tal : Gondal, Dist. Rajkot (Gujarat).** You must appear either in person or through a duly authorized advocate and submit your written statement.

Please be advised that if the defendant fails to appear on the aforementioned date and time or fails to submit written statement, the Court will proceed with the hearing of this suit ex-parter (unilaterally) and pass an appropriate order, which will be binding on the defendant.

This notice is published under **Order V, Rule 20 of the Civil Procedure Code, 1908.** Issued Today, **July 21, 2025.** by order of the Court.

STAMP OF COURT

**By order,**
**Registrar, Principal Senior Civil Judge Court, Gondal.**

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**ई-निविदा सूचना- ६२/२०२५-२६**

१. **रा.हा.वि ई.नि ३४० कोड ३००००६३७३६ :-** औ.वि.के. पारस संच ३ आणि ४ राखड हाताळणी विभाग येथे स्लरी डिस्पोजल पाईपलाईन १ आणि ३ साठी प्लेसमेंट कामासह ३०० एन बी एक्स्पॉशन मॉडीफाईड जाईन्ट आणि याच्या गॅस्केटचा पुरवठा करणे. (**Esti.** रू:- १६.४१ लाख, **EMD** रू:- १९९१६/-)
२. **च.सं ई.नि ३४१ कोड ३००००६३५२१ :-** औ.वि.के. पारस संच ४ येथे स्क्रुकंप्रेसर एच पी आणि एल पी एलिमेंटच्या रिकंडिशनिंगच्या कामाचा कंत्राट. (**Esti.** रू:- १२.८५ लाख, **EMD** रू:- १६३५५/-)
३. **उ वि ई.नि ३४२ / कोड ३००००६३६५१ :-** औ.वि.के. पारस येथे व्हेलोमिटर केबल आणि मिलिटरी कनेक्टरचा पुरवठा करणे. (**Esti.** रू:- ६.२१ लाख, **EMD** रू:- ९७१८/-)
४. **स्थापत्य विभाग ई.नि ३४३ / कोड ३००००६३८०६ :-** औ. वि. के. पारस येथे ई एस पी जवळ आर सी सी सेंटलिंग चेंबर प्रदान करण्याचा कंत्राट.(**Esti.** रू:- ७.२१ लाख, **EMD** रू:- १०७१३/-)
५. **विसं ई.नि ३४४ / कोड ३००००६३८२२ :-** औ.वि.के. पारस येथे स्थापीत पॅनेल बॉयलर साईड आणि आउटडोअर एरिया, व्हॉल्व्ह डी. बी. वेल्डींग डि. बी. लाईटिंगसाठी कॅनोपीचे फेब्रीकेशन, उभागरणी, कमिशनिंगच्या कामाचा कंत्राट (**Esti.** रू:- ६.९७ लाख, **EMD** रू:- १०४७०/-)

**१) ई निविदा अ.क्र. १ ते ५ विक्रिचा कालावधी दि. ०३.१२.२०२५ ते २३.१२.२०२५ सादरकरण्याची दि २४.१२.२०२५ वेळ १६.00 वा.**

टीप: सविस्तर माहिती करीता कृपया आमची वेबसाईट पहावी **https://eprocurement.mahagenco.in**

**मुख्य अभियंता औ.वि. केंद्र, पारस**

# एसटीत नव्या आठ हजार बसगाड्यांवर कंत्राटी चालक

अकोला : राज्य सरकार एसटीला स्वमालकीच्या ८ हजार नव्या गाड्या खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणार असून,प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. हा निर्णय प्रवाशांच्या दृष्टीने अत्यंत चांगला व दिलासा देणारा असला तरी त्याला लागणारे चालक मात्र कायमस्वरूपी देण्यास सरकारने असमर्थता दर्शविली असून, या गाड्यांवर कंत्राटी पद्धतीने चालक नेमले जाणार आहेत. पण त्याचा दूरगामी परिणाम एसटीच्या भवितव्यावर होणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत असून, कंत्राटी पद्धतीने करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रिये बाबतीत फेरविचार करण्यात आला पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे. एसटीच्या ताफ्यात येत्या सहा महिन्यांत नवीन ८ हजार गाड्या येणार असून, प्रवाशांच्या दृष्टीने हा अत्यंत चांगला व महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे.

या निर्णयामुळे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे सर्व स्तरातून स्वागत होत असून, बऱ्याच वर्षांनी एसटीच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर गाड्या येत असल्याने अनधिकृत खासगी वाहतुकीला मोठ्या प्रमाणात आळ बसेल अशी शक्यतासुद्धा वर्तवल जात आहे. एवढ्या मोठ्या संख्ये स्वमालकीच्या गाड्या बऱ्याच वर्षांने एसटीच्या ताफ्यात येत असून त्यावर चालक मात्र कंत्राटी पद्धतीं नेमले जाणार आहेत. हे कंत्राट ती वर्षासाठी असून, गाड्यांचे आयुर्मा मात्र १५ वर्षे असणार आहे. याशिवार निर्धारित १५ वर्षे पूर्ण झाल्यानंत व किलोमीटर संपल्यावर या गाड्य एलएनजीमध्ये रूपांतरित होणा असून, सध्या चालकांना इतर मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संध उपलब्ध झाल्या असून, त्यामुळे ती वर्षाचे कंत्राट संपल्यावर एवढ्य मोठ्या प्रमाणात चालक मिळतीलका? अशी शंका उपस्थित होत असून, एवढ्या मोठ्या प्रमाणात गाड्या घेतल्यानंतर त्यावर पुढे चालक मिळणे मुश्किल वाटते.

### श्री गुरु तेग बहादूर यांचे ३५० वे शहिदी समागम वर्ष

# जिल्ह्यात ठिकठिकाणी कार्यक्रम चित्ररथातून श्री गुरु तेग बहादुर साहिबजींच्या जीवनकार्यावर प्रकाश

■अकोला,दि २ (प्रतिनिधी) :
हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दी समागम वर्षानिमित्त नागपूर येथे भव्य कार्यक्रम होणार असून, अकोला जिल्ह्यातून शेकडो भाविक जाणार आहेत.

त्यानिमित्त जिल्ह्यात विविध उपक्रम घेण्यात येत असून, चित्ररथाद्वारे विविध ठिकाणांना भेट देऊन साहिबजींच्या जीवनकार्याची माहिती देण्यात येत आहे.जिल्ह्यातील सिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल व सिंधी समा जबांधवांची अधिक लोकसंख्या असलेल्या भागासह संपुर्ण जिल्ह्यात हा चित्ररथ फिरत असून साहिबजींच्या जीवनकार्यावर प्रकार टाकणारी चित्रफित रथाद्वारे ठिकठिकाणी दाखविण्यात येत आहे. दि.७ डिसेंबर रोजी नागपूर येथे शहिदी शताब्दी समागमा




निमित्त आयोजित कार्यक्रमाची जनजागृती देखील रथाच्या माध्यमातून केली जात आहे. अकोल्याबरोबरच जिल्ह्यातील महत्वाची शहरे, तसेच पातूर तालुक्यातील आलेगाव, पारस अशा विविध ठिकाणी चार चित्ररथांद्वारे कार्यक्रमाची माहिती पोहोचविण्यात येत आहे.

# उम्मीद पोर्टल ठप्प, हजारो मुतवल्लींची वाढली संकटे

■अकोला,दि २ (प्रतिनिधी) :
अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाने वक्फ मालमत्तांचे ऑनलाईन नोंदणीकरण अनिवार्य करण्यासाठी सुरू केलेला उम्मीद पोर्टल गेल्या अनेक दिवसांपासून ठप्प असल्यामुळे देशभरातील हजारो मुतवल्ली आणि वक्फ संस्थांना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पोर्टलमधील तांत्रिक बिघाडामुळे नोंदणी प्रक्रिया जवळजवळ ठप्प झाली आहे. याच समस्येवर कच्छी मशिद ट्रस्ट, अकोला चे अध्यक्ष जावेद झकरिया यांनी केंद्रीय मंत्र्यांना आणि राष्ट्रपतींना सविस्तर पत्र पाठवून तातडीचा हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. सरकारने सर्व मुतवल्लींना ५ डिसेंबर २०२५ पर्यंत पोर्टलवर नोंदणी व कागदपत्रे अपलोड करण्याचे आदेश दिले आहेत विलंब झाल्यास २०,००० ते १,००,००० रुपये पर्यंत दंडाच तरतूद आहे. लॉगिन पेज लोड होत नाही, कागदपत्रे अपलोड करणे जवळजवळ अशक्य झाले आहे. मुतवल्ली सायबर कॅफे व कार्यालयांतून वारंवार प्रयत्न करून थकून गेले आहेत त्यामुळे मुस्लिम संस्थांकडे स कागदपत्रे तयार असताना, सरकारी पोर्टलच्या बिघाडाचा फटक त्यांनाच का बसावा ? असा प्रश्न झकरीया यांनी उपस्थित केला.

# महावितरणच्या वेळापत्रक बदलामुळे शेतकरी चिंतेत

अकोला : महावितरण उपकेंद्र मिझोराम अंतर्गत येणाऱ्या उदेगाव,कुंभारी, मासा, डोंगरगाव तसेच येवता या गावांमध्ये शेतीपंपांसाठीच्या विजपुरवठ्याच्या वेळापत्रकात करण्यात आलेल्या बदला मुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत मोठीवाढ झाली आहे. शेतकरी व गावकऱ्यांच्या सततच्या तक्रारींच्यापार्श्वभूमीवर डोंगरगावचे किशोरकाकडे, चांदुरचे वैभव माहोरे, चांगेफळचे अंकुश इंगळे,टाकळीचेनारायण बोर्डे,लोणीचे हर्षल गोंडचवर, येळवण दिनेश मडावी तसेच सामाजिक कार्यकर्ते योगेश नागापुरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महावितरणचे उपअभियंता गोपाल अग्रवाल व तांबे यांना समस्ये बाबत निवेदन सादर केले.

# शिक्षक-पालक सभेचे यशस्वी आयोजन

■अकोट,दि २ (प्रतिनिधी) :
स्थानिक सेंट पॉल्स अकॅडमी, अकोट येथे नुकतीच शिक्षक पालक सभा संपन्न झाली. या सभेत वर्ग नर्सरी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वर्गानुसार स्वतंत्र सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. शाळेत असलेली शिस्त, वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन, उंचावलेलाशैक्षणिक दर्जा आणि प्रत्येक पालकांनी खेळात विद्यार्थ्यांचा सहभाग यामुळे विद्यार्थ्यांचा सातत्याने व सर्वांगीण विकास होत असल्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी आपल्या समस्या मांडल्या. समस्यांचे त्वरित निरसन करण्याचे आश्वासन मुख्याध्यापक यांनी दिले. मुलांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा बदल असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले. या सभेला संस्थाध्यक्ष नवनीत लखोटिया,उपाध्यक्ष लूनकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, तसेच दीपम लखोटिया, शारदा लखोटिया, सुधा डागा, रेखा चांडक, अवनी लखोटिया यांची उपस्थिती होती. मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, सारिका रेळे, मालती महल्ले हे सभेमध्ये उपस्थित होते. या सभेच्या यशस्वीतेसाठी मीना वर्मा, शुभांगी वाकोडे, पूजा राऊत, वैभव हिंगणकर, आनंद काळमेघ, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राजकोट- मेहबुबनगरसह काही विशेष गाड्यांना मुदतवाढ

**अकोला :** अकोला-पुर्णा मार्गे धावणाऱ्या राजकोट- मेहबुबनगर - राजकोटसह काही विशेष गाड्या रेल्वे विभागाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रवाशांच्या सुविधेसाठी व वाढत्या प्रवास मागणीची पूर्तता करण्याच्या उद्देशाने रेल्वेद्वारे ०४ जोड्या विशेष गाड्यांच्या फेऱ्यांचा विस्तार करण्यात आला आहे. मुदतवाढ देण्यात आलेल्या गाड्यांमध्ये राजकोट - महबूबनगर (साप्ताहिक) राजकोट महबूबनगर साप्ताहिक विशेषचा विस्तार २९ डिसेंबरपर्यंत करण्यात मदुरैआला आहे. महबूबनगर राजकोट साप्ताहिक विशेषचा विस्तार ३० डिसेंबरपर्यंत करण्यात आला आहे. ओखा - मदुरै (साप्ताहिक) विशेष गाडी ओखा साप्ताहिक विशेषचा विस्तार २९ डिसेंबरपर्यंत करण्यात आला आहे. मदुरै ओखा साप्ताहिक विशेषचा विस्तार २ जानेवारीपर्यंत करण्यात आला आहे. तिरुपती हिसार (साप्ताहिक) तिरुपती हिसार साप्ताहिक विशेषचा विस्तार २४ डिसेंबर पर्यंत करण्यात आला आहे.

# यंदा गुरुवारी होणार दत्त जयंती साजरी!

■अकोला,दि २ (प्रतिनिधी) :
दत्त जयंती ही हिंद पंचांगात असलेल्या मार्गशीर्ष पौर्णिमा या तिथीला साजरी केली जाते. हा दिवस म्हणजे भगवान दत्तात्रेय यांचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो. देशभरातील आणि विशेषत: महाराष्ट्रात हिंदू दिनदर्शिकेनुसार मार्गशीर्ष महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी हा उत्सव साजरा केला जातो. विशेष म्हणजे यंदा २०२५ मध्ये दत्त जयंती गुरुवारी आली आहे. गुरुवार हा दिवस दत्तगुरु आणि दत्तावतारांचे पूजन, नामस्मरण, उपासना यासाठी समर्पित मानला जातो. त्यामुळे गुरुवारी दत्त जयंती येणे हा योग अनन्य साधारण आणि अतिशय शुभ पुण्य फलदायी मानला गेला आहे.

घरोघरी महिलांनी दत्त जयंतीची जय्यत तयारी सुरू केली आहे. मार्गशीर्ष पौर्णिमेला मृगशीर्ष नक्षत्र असताना प्रदोष काळी दत्तगुरूंचा जन्म झाला. म्हणून सर्व प्रमुख दत्तक्षेत्री तसेच जेथे दत्त मंदिर असते तेथे या दिवशी प्रदोष काळी दत्त जन्म सोहळा केला जातो. या निमित्ताने अनेक कुटुंबामध्ये कुळाचार म्हणून मार्गशीर्ष शुक्ल अष्टमीपासून दत्त नवरात्र पाळले जाते. तसेच दत्त जयंतीच्या निमित्ताने 'श्रीगुरुचरित्र' ग्रंथाचे पारायण सामूहिक रीतीने अथवा घरोघरी व्यक्तिगत पातळीवर केले जाते. दत्त जयंतीच्या दिवशी जन्म सोहळ्याच्या वेळी सायंकाळी दत्तजन्माचे कीर्तनही होते. दक्षिणेत आंध्र प्रदेश, कर्नाटक तसेच तामिळनाडूत दत्त जयंती साजरी केली जाते.

दत्तोपासनेत ध्यानासाठी त्रिमुखी दत्ताचे सगुणरूप आणि पूजा विधीसाठी पादुकांना महत्त्व दिले गेलेले दिसते. नरसोबाची वाडी, औदुंबर, गाणगापूर या सर्व प्रसिद्ध दत्तक्षेत्री अशा पादुकांचीच स्थापना केलेली आढळते. योगसाधनेत दत्तात्रेयाला 'गुरु' मानले गेले. सर्वांचे 'गुरु' म्हणून मान्यता पावलेल्या दत्तात्रेयांनी स्वत: चोवीस गुरु केले. दत्तात्रेयांसारखा विशाल दृष्टिकोन ठेवला तर आपला व्यक्तिमत्त्वविकास होण्यास मदत होईल, असे म्हटले जाते.

# न्यू ईरा हायस्कूल माजी विद्यार्थी स्नेहमिलनाचा ऐतिहासिक सोहळा

■अकोला,दि २ (प्रतिनिधी) :
प्रागतिक शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला संचालित न्यू ईरा हायस्कूल, दामले चौक, रामदासपेठ येथे पुन्हा एकदा शाळेची घंटा ध्वनित होणार आहे. १९४२ साली स्थापनझालेल्या या शाळेतील १९५३ पासूनचे हजारो माजी विद्यार्थी येत्या २७ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित भव्य स्नेहमिलनासाठी एकत्र येणार आहेत.

सकाळी ८.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत भरविण्यात येणारा हा सोहळा विश्वविक्रमाच्या दिशेने वाटचाल करणारा ऐतिहासिक उपक्रम ठरत आहे. आजवर शाळेत अनेक माजी विद्यार्थी मेळावे झाले असले तरी १९६० ते २०१५ दरम्यान शिक्षण

घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर एकत्रित स्नेहमिलन होत आहे. २५ ते ८६ वयोगटातील विद्यार्थी अकोला, जिल्ह्यातील विविध भागातून, राज्यातील विविध शहरांतून तसेच परदेशातून उत्साहाने सहभागी होत असून ७०० पेक्षा अधिक माजी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या स्नेहमिलनात एकाच शाळेत शिकलेले भाऊ बहिण, आई वडीलही विद्यार्थी म्हणून जुन्या आठवणींना पुनश्च उजाळा देणार आहेत.

जुन्या वर्गखोल्या, शाळेची इमारत आणि प्रिय शिक्षक-शिक्षिकांसोबत गाठीभेटी घडणार असल्याने माजी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. कार्यक्रम दरम्यान चहा, नाश्ता, जेवण यांची व्यवस्थाही आयोजकांकडून करण्यात आली असून उपस्थित सर्वांना उत्तम आदरातिथ्याचा अनुभव मिळणार आहे. स्नेहमिलन यशस्वी होण्यासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. स्वागत, नोंदणी, सांस्कृतिक, खाद्यव्यवस्था, प्रसारमाध्यम, निवास व्यवस्था, मंच संचालन, सजावट, स्मरणिका आदी स्वतंत्र समित्या कार्यरत असून प्रत्येक समितीने नियोजनाची तयारी सुरू केली आहे. या उपक्रमासाठी माजी विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यासाठी चा वापर करण्यात आला असून, सर्वांनी आपल्या वर्गमित्र-मैत्रिणींसह लवकरात लवकरनोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या नियोजनासाठी रविवार, ३० नोव्हेंबर रोजी शाळा परिसरात बैठक पार पडली. प्रा. विश्वनाथ भार्गव गद्रे (अध्यक्ष, प्रागतिक शिक्षण प्रसारक मंडळ) म्हणाले, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची ही सुवर्णसंधी माजी विद्यार्थ्यांना अपार आनंद देत आहे. परदेशात राहणारे अनेक विद्यार्थीही सहभागी होणार असल्याने हा सोहळा संस्मरणीय ठरणार आहे. बैठकीस जयंत मधुकर मराठे (उपाध्यक्ष, प्रागतिक शिक्षण प्रसारक मंडळ व कार्यक्रम समिती अध्यक्ष ), मुख्याध्यापक महेश मोरेश्वर ठोके तसेच मोठ्या संख्येने आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# अकोला येथे ६ वी राज्यस्तरीय कराटे स्पर्धेचे भव्य उद्घाटन

■अकोला,दि २ (प्रतिनिधी) :
वसंत देसाई स्टेडियम येथे दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी ६ वी राज्यस्तरीय कराटे स्पर्धेचे भव्य उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र ॲमॅच्युअर कराटे असोसिएशन (मान्यता प्राप्त सलंग्न छघऋख कराटे-डो फेडरेशन ऑफ इंडिया) यांच्या वतीने करण्यात आले.या स्पर्धेमध्ये अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, कोल्हापूर, सातारा, बीड, जळगाव, मुंबई, नवी मुंबई, पालघर, ठाणे या जिल्ह्यांतील ३५० कराटे खेळाडू तसेच ५० प्रशिक्षक व अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला.उद्घाटन सोहळ्यात मान्यवरांची उपस्थिती लाभली मा. सतीशचंद्र भट्ट जिल्हा क्रीडा अधिकारी (उद्घाटक), मा. अरविंद भाऊ भिरड समाजसेवक (कार्यक्रम अध्यक्ष),मा. रोहित तांबे विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ (प्रमुख अतिथी)



अधिकारी,आयोजक सिहान अरुण सारवान अध्यक्ष, महाराष्ट्र ॲमॅच्युअर कराटे असोसिएशन,सेन्साई वासुदेव वाघ पाटील, डॉ. सेन्साई खुशबू चोपडे,तांत्रिक कार्यभार सेन्साई मयूर पाटळे,सेन्साई कैयुरी पटेल, सेंसई विनोद गुप्ता, भूपेंद्रसिंग सारवान, रितिक अग्रवाल, अक्षद गडेचा, हितेंद्रसिंग सारवान, गायत्री चत्तरकार, सोहन निकाडजे, विशाल कामरकर, सचिन मुन, विशाल मानवकर, धीरज लोरोकार, साक्षी जोगे, करण गुप्ता, देवानंद सरोदे, फलोरेशन नाशिकर, यश हरडे, शारदा किनाके, विशाली सुरकार यांनी उत्तमरीत्या सांभाळलाया स्पर्धेतून प्रविण्य सिद्ध केलेल्या खेळाडूंची निवड ६ वी राष्ट्रीय कराटे स्पर्धा ङ्ख ५ स्टार हॉटेल रेडिसन ब्ल्यू, फरीदाबाद - दिल्ली येथे करण्यात आली.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My HUSBAND Passport No is :- (J6006865)
---------From----------
**REKHA TEJRAO PATIL**
---------TO--------------
**REKHA TEJRAO GHULE**
My Residential Address is :- At Wadgaon Patan Post. Wadshingi Dist. Buldhana 443402.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Passport No is :- (J6006865)
---------From----------
**TEJRAO SADASHIV PATIL**
---------TO--------------
**TEJARAV SADASHIV GHULE**
My Residential Address is :- At Wadgaon Patan Post. Wadshingi Dist. Buldhana 443402.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
---------From----------
**AADITYA RAJU LAKADE**
---------TO--------------
**ADITYA RAJU LAKADE**
My Residential Address is :- Bhagirath Nagar Gurudev Nagar Mothi Umari Akola 444005.

# सद्यस्थितीत तुर पिकाची घ्यावयाची काळजी!

## शेतकरी बंधूंसाठी कडधान्य संशोधन विभागाचा सल्ला!

■अकोला,दि २ (प्रतिनिधी) :
कडधान्य पिकामध्ये तूर हे खरीप हंगामातील प्रमुख पीक आहे. देशामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, उत्तर प्रदेश, गुजरात व झारखंड हि महत्वाची तूर उत्पादक राज्ये आहेत असून य मध्ये महाराष्ट्र उत्पादनात पहिला व क्षेत्रानुसार दुसऱ्या क्रमांकवर आहे.देशामध्ये तूर पिकाखाली ४९.०० लाख हेक्टर क्षेत्र असून त्यापासून ४२.२२. लाख टन एवढे उत्पादन झाले व देशाची उत्पादकता ८६१ किलो/हेक्टर आहे. सन २०२३-२४ साली महाराष्ट्र राज्यात तूर या पिकाखाली १२.७५ लाख हेक्टर क्षेत्र होते तर ८.९६ लाख टन एवढे उत्पादन झाले व राज्याची उत्पादकता ७२२ किलो/हेक्टर आहे. विदर्भात सुमारे ६ लाख हेक्टर क्षेत्र तुर लागवड होते.

तूर लागवडीसाठी जमिन मध्यम ते भारी ३० ते ४५ सेंमी खोल व पाण्याचा उत्तम निचरा होणारी असावी या पिकास २१ ते २४ अंश सें तापमान चांगले मानवते. पाण्याची कमतरता असेल तर भारी जमिनीत हे पिक जास्तीत जास्त ३० ते ३५ अंश सें तापमानात सुद्धा चांगले येते. फुले व शेंगा भरण्याच्या कालावधीत कोरडे समशीतोष्ण हवामान या पिकास अवश्यक आहे. सद्यस्थितीत जेथे पीक फुलोरा, दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे, तेथे पिकाची शारीरिक क्रिया मंदावून फुलगळ होण्याची शक्यता आहे. तसेच पेशीतील पाणी थंडीमुळे आकसून पेशींना हानी होण्याची शक्यता असते. त्यामुळे दाणे आकसणे तसेच तडकण्याची शक्यता आहे.

सध्या खरिपातील तुरीचे पीक कोरडवाहू पट्ट्यात फुलोरा आणि शेंगा परिपक्व होण्याच्या अवस्थेत आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमानातील चढ उतार/थंडीचा जोर कमी होऊन यामुळे फुल गळ होण्याची दाट शक्यता असते त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. बदलत्या हवामानामुळे या पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. फुलगळ होण्याची मुख्य कारणे तापमानातील चढ-उतार/थंडीची लाट (Cold Wave)

अति पाऊस किंवा दुष्काळपोषणद्रव्यांची कमतरता (छ, झ, Boron) कीड-रोगांचा प्रादुर्भावपाण्याचा ताण जास्त वारा किंवा ओलावा फुलगळ नियंत्रणासाठी करावयाच्या उपाययोजनाअ) शेत व्यवस्थापन १. कुसकरून व चांगल्या निचऱ्याची जमीन तयार करणे.२. शेतामध्ये शेवटच्या वखराची पाळी देण्यापूर्वी २५ ते ३० गाड्या प्रती हेक्टरी शेणखत पसरविणे.३. पेरणीचे दोन ओली मध्ये अंतर ९०-१२० सेमी ठेवावे. ४. आंतरमशागत : वेळेवर डवरणी व निंदणी करून जमिनीस हवेशीर परिस्थिती निर्माण करणे.इ) पोषण व्यवस्थापन १. मूलभूत खते :- छझघ : २५:५०:३० कि.ग्र. प्रती हेक्टर शिफारसीनुसार पेरणीचे वेळी टाकणे. तशेच फांद्या फुटण्याच्यावेळी डॉ पंदेकृवि निर्मित मायक्रो ग्रेड १० ची ०.५% प्रमाणे फवारणी करावी व फुलोरा अवस्तेत १% नुसार फवारणी करावी.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला**
मुर्तिजापूर रोड, अकोला - 444001
वेब पत्ता : mjp.maharashtra.gov.in
ई-मेल : eemjpda@rediffmail.com

जा.क्र. / निविदा / ३०१६ / २०२५
दिनांक : ०२-१२-२०२५

**-- निविदा सुचना --**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला या कार्यालयाकडुन खालील निविदा सुचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | निविदा सुचना क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | क्रमांक ५० सन २०२५-२६ | लंघापुर ५७ गावे प्रादे. पा.पु.योजना देखभाल व दुरुस्ती अंतर्गत लाखपुरी झोनचा २० एच.पी. सबमर्सिबल पंपाचा पुरवठा उभारणी व चाचणी करणे. | रु. १,६५,७११/- |
| २ | क्रमांक ५१ सन २०२५-२६ | जल जीवन मिशन अंतर्गत वाडेगांव २४ गावे प्रादे. पा.पु. योजना - हेक्सक्र्स येथे विद्युत पुरवठा, ईलेक्ट्रीक केबल्स व अनुषंगीक कामे. | रु. ८,४४,४९३/- |
| ३ | क्रमांक ५२ सन २०२५-२६ | जल जीवन मिशन अंतर्गत कुरुम व २ गावे प्रादे. पा.पु. योजना - हेक्सक्र्स येथे विद्युत पुरवठा, ईलेक्ट्रीक केबल्स व अनुषंगीक कामे. | रु. ८,४३,०७३/- |

या उपरोक्त सर्व कामांची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडुन मागविण्यांत येत असुन सदर निविदेचा विक्री कालावधी दि. ०३/१२/२५ ते १०/१२/२५ असा असुन निविदा भरुन सादर करण्याचा दि. ११/१२/२५ दु. ३.०० वाजेपर्यंतचा आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. ०३.१२.२०२५ पासुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला येथील निविदा शाखेत पाहण्यास निशुल्क उपलब्ध आहेत.

**कार्यकारी अभियंता**
म.जी.प्रा.विभाग,अकोला.

RNI NO-46973/1986 **Mahasagar Akola** Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ **महासागर अकोला** **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# बिहारमधील भाजपाचा सम्राट!

लालूप्रसाद यादव यांचा राष्ट्रीय जनता दल (राजद) व नितीशकुमार यांचा जनता दल युनायटेड असा प्रवास करून भारतीय जनता पक्षात आलेल्या सम्राट चौधरी यांच्याकडे बिहारमधील एनडीए सरकारमधील सर्वात शक्तिशाली गृहखात्याचे मंत्री म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सम्राट चौधरी हे नितीशकुमार यांच्या सरकारमधे उपमुख्यमंत्री आहेत. गृहखाते मिळाल्याने त्यांचे महत्व वाढले आहे.

-----------

नितीशकुमार यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेऊन देशात विक्रम निर्माण केला आहे. त्यांनीही कधी काँग्रेस - राजद तर कधी भाजपा अशा युती व आघाड्या बदलत सत्ता कायम राखली आहे. मुख्यमंत्रीपदाच्या वीस वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी कधीच गृहखाते दुसऱ्या कोणाला दिले नव्हते.

पण यावेळी राज्यात सर्वाधिक ८९ आमदार निवडून आलेल्या भाजपाच्या दबावापुढे नितीशकुमार यांना झुकावे लागले आहे. कोणत्याही राज्यात मुख्यमंत्रीपद मित्र पक्षाला दिले की गृहखाते भाजपा आपल्याकडे ठेवतो पण बिहार त्याला आजवर अपवाद होता, पण आता तेथेही हे मौल्यवान , संवेदनशील व ताकदवान खाते आता भाजपाने आपल्याकडे ठेवले असून त्याची जबाबदारी सम्राट चौधरी यांच्याकडे सोपवली आहेत. सम्राट चौधरी हे काही मुळचे भाजपाचे नाहीत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेही नाहीत.

संघ परिवाराशी त्यांचा संबंधही नव्हता. पण राजद, जनता दल यु असे फिरत फिरत आठ वर्षापूर्वी पक्षात आलेले सम्राट हे भाजपाचा चेहरा बनले आहेत. पक्षविस्तार व सरकार अशा दोन्ही पातळीवर सम्राट चौधरी हे जास्त उपयुक्त आहेत अशी खात्री पटल्यामुळेच सम्राट यांना भाजपाने बिहारमधील नंबर १ चा नेता बनवले आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपा- जनता दल यु प्रणित एनडीएला आश्चर्यकारक प्रचंड जनादेश मिळाला. राजद आणि काँग्रेसचे पानीपत झालेच पण प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षाला भोपळाही फोडता आला नाही.

आता बिहारच्या मैदानात एनडीएची घोडदौड पाच वर्षे सुसाट असणार हे स्पष्ट झाले. बिहारमधे नितीशकुमार यांना बरोबर घेऊन सत्ता तर मिळवली पण उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, हरयाणा, दिल्ली, राजस्थान, आदी हिंदी भाषिक राज्यात भाजपाने आपले मुख्यमंत्री केले.

बिहारमधे ही किमया भाजपाला आजवर जमलेली नाही. पण यावेळी नितीशकमार यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाचा मान देऊन भाजपाने गृहमंत्रीपद शिताफीने आपल्याकडे काढून घेतले.

बिहारमधे काही काळ अपवाद वगळता सन २००५ पासून एनडीएचे सरकार आहे. पण यापुर्वी भाजपाला गृहमंत्रीपद कधीच मिळाले नव्हते किंवा नितीशकुमार यांनी ते आपल्याकडून सोडले नव्हते. बिहारमधे गेल्या त्रेपन्न वर्षात आजवर झालेल्या मुख्यमंत्र्यांनी गृहमंत्रीपद प्रथमच दुसऱ्या पक्षाला दिले आहे.

नितीशकुमार हे अतिशय धूर्त राजकारणी आहेत. गेली वीस वर्षे सलग ते मुख्यमंत्रीपदावर आहेत. त्यांनी गृहखाते भाजपाला दिले ही त्यांची हतबलता असू शकते. भाजपाबरोबर सत्तावाटपाच्या झालेल्या सौदेबाजीत मुख्यमंत्रीपदाच्या बदल्यात त्यांना गृहमंत्रीपदाचा त्याग करावा लागला हेच वास्तव आहे.

अगोदरच्या सरकारमधे सम्राट चौधरी हे अर्थ व व्यापारमंत्री होते. आता त्यांना एकप्रकारे भाजपाने बढती दिली आहे. विशेष म्हणजे नव्या सरकारमधे दुसरे उपमुख्यमंत्री असलेल्या विजयकुमार सिन्हा यांच्याकडे महसूल खाते आहे पण गृहखाते सम्राट चौधरींकडे देण्यात आले आहे.

सम्राट चौधरींकडे गृह खाते याचा अर्थ राज्यातील कायदा सुव्यस्थेची सारी जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. पोलीस महासंचालकांपासून पोलीस उपायुक्तांपर्यंत सर्व अधिकारी हे त्यांच्याशी थेट संपर्क साधून अद्ययावत माहिती देतील. हिंसाचार, दंगली, मोठी गुन्हेगारी, अपहरण, अटक,स्थानबध्दता अशांवर त्यांचे पूर्ण नियंत्रण राहिल. राज्यातील नक्षलवाद, संघटीत गुन्हेगारी, ऑपरेशन ग्रीन हंट, सर्च ऑपरेशन, टोळी युध्द, गँगस्टर यावर लगाम घालण्याचे काम त्यांच्या मार्गदर्शनाखाली होईल.

**स्टेटलाईन**
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

जेल सुरक्षा, व्हिआयपी सुरक्षा, आदी प्रक्रिया त्यांच्या अखत्यारीत येतील. धार्मिक उत्सव, सणवार, धार्मिक मिरवणुका, मंदिरांची सुरक्षा, गर्दीवर नियंत्रण यासाठी त्यांना चोवीस तास सतर्क राहवे लागेल.

एनडीएला निवडून दिले नाहीत तर बिहारमधे पुन्हा जंगलराज येईल असा इशारा मोदी- शहा प्रत्येक प्रचार सभेतून देत होते. लालू- राबडी देवी कारकिर्दीतील बिहारची भयाण अवस्था सांगत होते. म्हणून सम्राट चौधरी यांना गृहमंत्री म्हणून डोळ्यात तेल घालून काम करावे लागेल.

बिहारमधे भाजपाकडे प्रथमच गृहखाते आले, यामुळे राज्यातील सत्ता समिकरणे बदलली आहेत. सम्राट हे मुंगेर जिल्ह्यातील तारापूर जवळील लखनपूर गावचे. १९९० मधे त्यांनी लालूप्रसाद यादव यांच्या राजदमधे प्रवेश केला. त्यावेळी राज्यात राजद शक्तिशाली होता व राजदचीच चलती होती. त्यांचे वडिल शकुनी चौधरी हे तारापूरमधून अनेकदा निवडून आलेत.

सम्राट चौधरी हे राबडी देवी यांच्या नेतृत्वाखालील राजद सरकारमधे कृषी मंत्री होते. (भाजपाच्या भाषेत जंगलराज) तेव्हा ते आमदारही नव्हते. त्यांच्या वयावरून बराच वादंग निर्माण झाला होता. नंतर त्यांना मंत्रीपदाचा राजीनामा देणे भाग पडले.

यंदाच्या निवडणुकीत प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षाने चौधरींवर अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याचे आरोप केले. त्यांनी केलेल्या प्रतिज्ञापत्रातही विसंगती असल्याचे दाखवून दिले. प्रशांत किशोर यांनी केलेल्या आरोपांचा चौधरी यांनी इन्कार केला व आपल्यावर गंभीर गुन्हे नव्हते असेही म्हटले.

१९९९ मधे सम्राट यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला पण सन २००० मधे ते राजदच्या तिकीटावर पुन्हा निवडून आले. राजदमधे त्यांचे महत्व वाढत गेले व सन २०१० मधे विधानसभेत ते पक्षाचे मुख्य प्रतोद बनले. पण २०१४ मधे राजदच्या पराभवानंतर पक्षाच्या तेरा आमदारांना घेऊन त्यांनी जनता दल यु मधे प्रवेश केला व लालू यादव यांना मोठा हादरा दिला.

जतिराम मांझी फार कमी काळ मुख्यमंत्री होते, त्यांच्या सरकारमधे सम्राट चौधरी नगरविकास मंत्री होते. देशभरात असलेली भाजपाची लाट पाहून चौधरी सन २०१७ मधे भाजपात आले. भाजपाने त्यांचे लाल गालिचा अंथरून स्वागत केले व प्रदेश उपाध्यक्षपद दिले.

सन २०२० ते विधान परिषदेवर निवडून आले व भाजपाने त्यांना विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी दिली. सन २०२३ मधे भाजपाने त्यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. भाजपाचा ओबीसी चेहरा म्हणून त्यांना पक्षाने प्रकाशात ठेवले.

सन २०२४ मधे नितीशकुमार यांनी राजद- काँग्रेसशी काडीमोड घेतला व एनडीएमधे परतले तेव्हा एनडीए सरकारमधे सम्राट चौधरी यांना उपमुख्यमंत्री म्हणून बढती मिळाली. सन २०२५ च्या निवडणुकीत चौधरी राजदचा पराभव करून मोठ्या मताधिक्याने निवडून आले व नवीन सरकारमधे उपमुख्यमंत्रीपद व गृहखाते त्यांना मिळाले.

बिहारच्या निवडणुकीत मोठ्या बहुमताने एनडीएचे सरकार येणार याची भाजपाला पूर्ण खात्री होती. म्हणूनच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दोन महिने अगोदर नितीशकुमार यांच्याशी स्वतंत्र चर्चा करून विकासापेक्षा राज्यातील कायदा सुव्यवस्था किती महत्वाची आहे हे आकडेवारीनिशी पटवून दिले होते.

बिहारमधे कठोर कायदा व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी योगी पॅटर्न राबवला पाहिजे याचीही चर्चा झाली. नेपाळ-बिहार सरहद्द संवेदनशील आहे, नेपाळमधे राजकीय अस्थिरता आहे. बनावट नोटा, ड्रग्ज, शस्त्रास्त्रे, घुसखोरी , धार्मिक व दहशतवादी संघटना, बांगला देशातून रोहिंग्यो असे सर्व धोके बिहारच्या सरहद्दीवरून प्रवेश करतात. अशा वेळी गृहखाते भाजपाच्या हाती असणे गरजेचे आहे हे शहा यांनी नितीशकुमार यांना पटूवन दिले.

नितीशकमार यांना वयोमानाप्रमाणे कठोर राजकारणी म्हणून काम करायला मयार्दा आहेत. याची त्यांनाही जाणीव आहे. गुन्हेगार एक तर तुरूंगात असतील किंवा कबरीत असतील, असा योगी स्टाईल इशारा सम्राट चौधरी यांनी दिला आहे. म्हणूनच भाजपा हायकमांडचा त्यांच्यावर विश्वास आहे.

---

## अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी



मराठी साहित्यातील अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७४ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला.

त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुदैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले.

बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले.

बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले.

बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले.

आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला.

१९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला.

पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या सा?यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती.

शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

*अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर*
*आधी हाताला चटके तेंव्हा (मियते) मिळते भाकर..*
*खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा*
*पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला....*
*मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर*
*किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...*

यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत.

बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते.

आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७४ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

■ ■ ■

---

# ग्रामीण समृद्धीचा प्रवास, विज्ञानाधिष्ठित प्रगतीचा अभिमान

## माफसूचा २५ वा स्थापना दिन



३ डिसेंबर २००० रोजी नागपूर येथे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाची (माफसू) स्थापना झाली आणि आज तब्बल पंचविशीचा प्रवास पूर्ण करताना हे विद्यापीठ प्रगतीच्या नवनव्या क्षितिजांना स्पर्श करत आहे. शिक्षण, संशोधन आणि विस्तार या त्रिसुत्री ध्येयाने सुरू झालेली ही यात्रा आज ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करणाऱ्या ज्ञानकेंद्राच्या रूपात विकसित झाली आहे. पशुसंवर्धन, दुग्धोत्पादन आणि मत्स्य विज्ञान या क्षेत्रांत नवतंत्रज्ञान, संशोधन, रोजगारक्षमता आणि शाश्वत विकासाचा दीपस्तंभ म्हणून राज्यातच नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर एक अग्रगण्य विद्यापीठ म्हणून ओळखले जाते.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

स्थापनेच्या वेळी विद्यापीठाला पाच पशुवैद्यकीय महाविद्यालये, एक पदव्युत्तर संस्था आणि एक दुग्धतंत्रज्ञान महाविद्यालय हस्तांतरित करण्यात आली. पुढील काळात विद्यापीठाने आपला शैक्षणिक आणि संशोधनाचा विस्तार करत दोन मत्स्य विज्ञान महाविद्यालये, आणखी एक दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्र आणि तीन कृषी विज्ञान केंद्रे अशी संस्थात्मक वाढ साध्य केली.

हे केवळ विस्तार नव्हे तर ग्रामीण भागातील रोजगार, उद्योग, आरोग्य आणि आर्थिक स्थैयार्सा्ठी माफसूने निर्णायक योगदान दिले. हा प्रवास केवळ संस्थात्मक विस्ताराचा नाही, तर ग्रामीण समाजपरिवर्तनाच्या शक्तिशाली यज्ञाचा माफसूचा स्थापना ते आज परिवर्तनाचा आहे.

पशुधन आरोग्य, दुग्ध उत्पादन, मासेमारी, आणि वन्यजीव संरक्षण क्षेत्रात उच्च स्तरीय संशोधन; पशुवैद्यकीय, दुग्ध व मत्स्य विज्ञान क्षेत्रातील कुशल, समाजाभिमुख आणि तंत्रज्ञानसाक्षर मानवबलाची निर्मिती; ग्रामीण युवकांसाठी उद्योजकता प्रशिक्षण व रोजगारक्षमतेचे संवर्धन; पशुसंवर्धन, मत्स्य व दुग्ध विकास धोरणांमध्ये सरकारचे विचारकेंद्र (थिंक टँक) म्हणून प्रभावी भूमिका; विस्तार शिक्षणाद्वारे शेतकरी, पशुपालक, मच्छीमार व दुग्ध व्यवसायिकांना सशक्त करणारे उपक्रम; पशुकल्याण, जैवसुरक्षा, खाद्य सुरक्षा आणि मानवी आरोग्य यासंदर्भातील राष्ट्रीय स्तरावरील योगदान ही माफसूची २५ वर्षांची वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी आहे.

या २५ वर्षांत माफसूने आधुनिक तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, पशुजनुकशास्त्र, पशुआरोग्य सेवा, दुग्ध स्वच्छता आणि मत्स्यसंवर्धन यांत नवे क्षितिज गाठले. लसीकरण, रोगनियंत्रण, पशुसंवर्धन; जैव सुरक्षा मॉडेल्स; पशुजनुक सुधारणाद्वारे उत्पादन वाढ; मत्स्य संवर्धनातून ग्रामीण भागात ब्लू इकॉनॉमीचा विकास; दुग्ध उद्योगात वॅल्यु एडिशन आणि फूड सेफ्टी चे नवे मापदंड तयार करून माफसूने विज्ञानातून विकास आणि संशोधनातून समृद्धी यांचा संगम घडवून आणला. तसेच विद्यापीठाने वन्यजीव संशोधन व पशु कल्याण या क्षेत्रांतही उल्लेखनीय संशोधनात्मक योगदान दिले आहे.

आज माफसू केवळ एक विद्यापीठ नसून ग्रामीण विकासाचा प्रेरणास्त्रोत; शेतकरी, दुग्धोत्पादक आणि मच्छीमार यांचे सशक्तीकरण केंद्र; शाश्वत विकास आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या धोरणांचे मार्गदर्शक विचारमंच आणि पशुसंवर्धन व स्वास्थ्याच्या राष्ट्रीय चळवळीचा नेतृत्वकर्ता व ग्रामीण परिवर्तनाचा प्राणवायु आहे.

आजचा दिवस हा केवळ विद्यापीठाचा उत्सवाचा नाही, तर चिंतन, संकल्प आणि नव्या भविष्यदृष्टीचा दिवस तसेच भूतकाळातील यशाचा सन्मान; वर्तमानातील कार्याची जाणीव आणि भविष्यातील नवउत्कर्षाची प्रेरणा आहे.

तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्य अधिक सक्षम करणे; महिला, ग्रामीण युवक, पशुपालक आणि मच्छीमार यांना प्रशिक्षणातून स्वावलंबी बनवणे; हरित व निळ्या अर्थव्यवस्थेला चालना देणे; पशुकल्याण, जैवसुरक्षा आणि खाद्य सुरक्षा यास राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर बळकटी देणे हा विद्यापीठाचा प्रगतीचा भविष्यकालीन संकल्प आहे.

ज्ञानातून समृद्धी, विज्ञानातून विकास आणि विस्तारातून समाजपरिवर्तन हीच माफसूची खरी स्थापना दिनाची प्रेरणा आणि भविष्यातील दिशा हाच विद्यापीठाचा प्रगतीचा संकल्प आहे. माफसूच्या २५ व्या स्थापना दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

■ ■ ■

---

# पण, शासन बहिरं झालयं!

(कालच्या अंकावरून पुढे)

---------------

शेतकरी जागा होतोय, आणि आता सरकारला जागं व्हायलाच हवं! शेतकरी शांत आहे म्हणून तो मुर्ख नाही. तो सहनशील आहे म्हणून तो कमकुवत नाही.तो शांत बसलेला आहे कारण त्याला श्रमावर विश्वास आहे. पण आज त्याला दिसू लागलंय.श्रमानं पिकतं पीक, पण अन्यायानं मरतो शेतकरी! सरकारने आता तरी MSP किमान उत्पादन खर्च + 50% नफा या सूत्रावर द्यावी, बाजार व्यवस्थेतील दलालांचा मक्तेदारी मोडावी.शेतमाल खरेदीची हमी व्यवस्था लागू करावी. शेतकऱ्यांचे इनपुट (बियाणे, खत, औषधे) दर कमी करावेत.आयात-निर्यात धोरण स्थिर ठेवावं. हे केलं नाही तर आगामी वर्षांत शेतकरी खचून जाईल,आणि देशाची अन्नसाखळी कोसळेल!

आता शेतकऱ्याचं जगणं प्रश्न आहे, आकड्यांचा नाही! सोयाबीनची एक बॅग सांगते शेतकरी कशा वेदनेतून जातोय.

ही दिवाळी नाही.ही अंधाराची रात्र आहे.

सरकारने आता तरी अन्नदात्याला न्याय द्यावा! अन्यथा शेतकरी संघटितपणे रस्त्यावर आल्यास शासनाला भारी पडेल विद्रोह होण्यास वेळ लागणार नाही मग शासकीय जेल सुद्धा कमी पडू शकेल. आता तरी सरकारने शेतकरी व त्याची शेती समजून घ्यावी व त्याला न्याय द्यावा ही नम्र विनंती.

गजानन हरणे
वारकरी समाजसेवक
खडकी, अकोला.
9822942623

■ ■ ■

---

## लग्नात खर्च नव्हे, तर संस्कार दिसायला हवेत!

**वाचक लिहितात**

सध्या लग्न म्हटले की दागदागिने, महागडे कपडे, उंची भेटवस्तू, विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, महागडे डेकोरेशन, सेलिब्रिटी मेकअप, डीजे आणि त्यासमवेत मद्याच्या मेजवान्या या सर्व गोष्टी ओघाने येतात. अनेक ठिकाणी तर वेडिंग प्लॅनर आणि डेस्टिनेशन वेडिंग हीसुद्धा नवी फॅशन झाली आहे.

आज महागाई वाढत असूनही राज्यासह देशाच्या अनेक भागांत विवाह हा केवळ धार्मिक विधी राहिला नसून श्रीमंती, प्रतिष्ठा आणि प्रदर्शनाचा कार्यक्रम बनला आहे.

एका दिवसातील विवाहसोहळ्यात काही लाखांपासून ते काही कोटी रुपयांपर्यंत खर्च होताना दिसतो.

शोध सांगतात की देशातील सुमारे ३०% तरुण लग्नासाठी कर्ज घेतात आणि ते फेडण्यासाठी अनेक वर्षे झगडतात. काही जण केवळ रूढी किंवा समाज काय म्हणेल या भीतीने खर्च करतात, तर काही जण आपली ह्यस्टेटसह्ण टिकवण्यासाठी मागे कर्जाचे डोंगर उभे करतात. ही उधळपट्टी केवळ आर्थिक भार वाढवत नाही, तर सामाजिक असमानता, दिखावा आणि मानसिक ताणही वाढवते.

### उत्तराखंडचा आदर्श निर्णय

या पार्श्वभूमीवर उत्तराखंडमधील जौनसर-बावर या प्रदेशातील लोकांनी एक अतिशय अनुकरणीय निर्णय घेतला आहे आणि आज तो संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनला आहे. या भागातील परंपरा, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्य आजही टिकून आहे. तेथे अनेक ठिकाणी पांडवकालीन न्यायव्यवस्थेचे पालन होते असे मानले जाते. येथील २५ गावांनी मिळून एकत्रितपणे असा नियम केला आहे की, लग्नात महागडी सजावट, दारू, फास्ट फूड आणि अतिखर्ची वस्तूंवर संपूर्ण बंदी, नियम मोडणाऱ्यांना १ लाख रुपयांचा दंड, महिलांनी लग्नात केवळ तीन पारंपरिक दागिनेच वापरायचे.

जरी या गावांची आर्थिक क्षमता चांगली आहे, तरीही त्यांनी ठरवले की, लग्नात खर्च नव्हे, संस्कार दिसायला हवे.

विवाह सोहळा संस्कार म्हणून केला तर पुढे दोघांचेही आयुष्य सुरळीत सुख-समृद्धीचे होऊ शकते लग्नात डेकोरेशन मेकअप नाच गाणे यामुळे मुहूर्तावर लग्न लागतात नाही. लग्न मोडण्याची जी कारणे आहे त्यातील एक कारण मुहूर्तावर लग्न न लागणे हे पण असू शकतं.


### विवाहाचा मूळ हेतू

विवाह हा जीवनातील अत्यंत पवित्र संस्कार आहे. तो क्षणिक दिखावा, प्रतिष्ठेची स्पर्धा किंवा आर्थिक ओझे बनू नये. समाजात सुरू झालेली साधेपणाची ही चळवळ केवळ आर्थिकच नव्हे, तर नैतिक आणि सांस्कृतिक जागृतीचे प्रतीक आहे. जर देशभरात अशा विचारांची रुजवण झाली, तर विवाहसोहळे पुन्हा संस्कार, कुटुंब प्रेम आणि अध्यात्माने भरलेले होतील दिखावा, कर्ज आणि ताणाने नव्हे.

■ सौ. रमा देशमुख, नागपूर.

---

# शरिरावर टॅटू काढल्यामुळे खरच स्किन कॅन्सर होतो?



टॅटू काढण्याची फॅशन आजकाल जोरात सुरू आहे, अनेक जण आपल्या हातावर किंवा शरीराच्या इतर भागांवर वेगवेगळ्या डिझाइनचे सुंदर असे टॅटू काढतात. टॅटूमुळे शरीर आकर्षक दिसतं, सर्वसामान्यपणे शरीरावर टॅटू काढल्यामुळे कोणतंही नुकसान होत नाही.

मात्र असं देखील म्हटलं जातं की अशा प्रकारचे टॅटू काढल्यामुळे काही प्रमाणात एचआयव्हीचा धोका देखील असतो. मात्र आता एका संशोधनातून हादरवणारी माहिती समोर आली आहे. स्वीडन विद्यापीठाच्या संशोधनातून असं समोर आलं आहे की, शरीरावर टॅटू काढल्यामुळे कॅन्सरचा देखील धोका वाढतो. संशोधनातून असं समोर आलं आहे की, जे आपल्या शरीरावर टॅटू काढतात त्यांना मेलानोमा (एक प्रकारचा स्किन कॅन्सर) चा धोका इतर लोकांच्या तुलनेत अधिक असतो.

या संशोधनामध्ये २० ते ६० वयोगटातील सुमारे २८८० लोकांना सहभागी करून घेण्यात आलं होतं, ज्यांना मेलानोमा नावाचा कॅन्सर झाला होता. या रिसर्चमधून असं समोर आलं आहे की, शरीरावर टॅटू काढताना ज्यांचं वय हे दहा वर्षांपेक्षा अधिक आहे, अशा लोकांना या कॅन्सरचा धोका तुलनेनं जास्त आहे.

रिसर्चमध्ये असं समोर आलं की, टॅटू बनवण्यासाठी जी इंक वापरली जाते, ती इंक जेव्हा आपल्या त्वचेमध्ये इंजेक्ट केली जाते, तेव्हा आपलं शरीर या इंकला शरिराबाहेरील हानिकारक तत्व मानतं, आपल्या शरीरावर कोणी तरी हल्ला केला आहे, असं वाटल्यामुळे शरीराची इम्यून सिस्टम सक्रिय होते. त्यामुळे ही इंक रोगप्रतिकारक पेशींनी वेढली जाते. मात्र ही इंक पेशींपर्यंत पोहोचते.

टॅटू बनवण्यासाठी जी इंक वापरी जाते, त्यामध्ये अशी काही द्रव्य असतात जी पुढे चालून कॅन्सरसारख्या रोगाला कारणीभूत ठरतात. जर तुमच्या शरीराचा टॅटू काढलेला भाग जास्त काळ सतत सूर्याच्या संपर्कात राहिला तर तुम्हाला कॅन्सरचा धोका इतरांच्या तुलनेनं अधिक वाढतो, असं हे रिसर्च सांगतं.

मात्र जरी धोका वाढत असला तरी देखील या रिसर्चमधून ठोस असा निष्कर्ष काढण्यात आलेला नाहीये की, टॅटूमुळे कॅन्सर होतोच म्हणून, फक्त त्यामध्ये असं म्हटलं आहे की, टॅटू काढणाऱ्यांमध्ये टॅटू न काढणाऱ्यांपेक्षा कॅन्सरचा धोका अधिक असतो.

टॅटू आणि कॅन्सरचा थेट संबंध या संशोधनात कुठेही आढळून आलेला नाहीये. त्यामुळे आपला टॅटू असलेला शरिराचा भाग हा थेट सूर्य प्रकाशात वारंवार आणि जास्त काळ येणार नाही, याची काळजी घ्यावी, असं हे संशोधन सांगतं.

■ ■ ■

---

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### कितना बदल गया इन्सान..!

**आधी दरोडेखोर वाजत गाजत**
**करीत होते लुटालूट**
**आता जनसेवेचे व्रत स्विकारुन**
**शासकीय तिजोरी**
**लुटण्याची सुट..।**

**केलाच जनतेने आक्रोश तर**
**मिल बाटके खायेंगेचे**
**तत्व आणावे अमलात**
**लाडली बहना, फुकट वाटप**
**योजना राबवाव्या धडाक्यात**

**तरी नाहीच मिळाली सत्ता तर**
**युतीचा फार्म्युला वापरावा**
**जय सहकार ऐवजी छुपा**
**जय स्वाहाकारचा**
**नारा लावावा ..!**

# निवडणूक आयोगाने मोठा घोळ घातला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :
राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील अनागोंदीवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणी त्यांनी राज्य निवडणूक आयोगाला धारेवर धरत आयोगाचा हा निर्णय अनाकलनीय असल्याचे म्हटले आहे.

निवडणूक आयोगाने सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावत निवडणुका पुढे ढकलल्या. निवडणूक सरसकट पुढे ढकलणे योग्य नाही. आयोगाचा हा निर्णय अनाकलनीय आहे, असे ते म्हणालेत.

राज्य निवडणूक आयोगाने अनेक ठिकाणची स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक २० डिसेंबरपर्यंत लांबणीवर टाकली आहे. या प्रकरणी राजकीय वतुर्ळातून संतप्त प्रतिक्रिया येत असताना आता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानेही आज होणा?या निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबरपर्यंत लांबणीवर टाकला आहे. यावर सर्वच पक्षांच्या नेत्यांनी संतप्त भावना व्यक्त केली आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे या प्रकरणी निवडणूक आयोगावर आगपाखड करताना म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाने प्रचंड मोठा घोळ घातला आहे.

**आयोगाचा निर्णय अनाकलनीय**

सरकारने या प्रकरणी नियमानुसार आपली बाजू सांगितली. पण आयोगाने ती ऐकली नाही. हे चुकीच्या पद्धतीने चालले आहे. ज्या पद्धतीने राज्य निवडणूक आयोगाने घोळ घातलात त्या प्रमाणे आता त्यांनी पुढे जावे. आगामी निवडणुका मोठ्या आहेत.

हा घोळ राज्य निवडणूक आयोगाने संपवावा, अन्यथा आम्ही प्रचार करायचा आणि निवडणूक आयोगाने एक पत्रक काढून निवडणुका पुढे ढकलायच्या हे योग्य नाही. आयोगाने चुकीचा अर्थ काढून निवडणुका पुढे ढकलल्या. निवडणूक सरसकट पुढे ढकले योग्य नाही. आयोगाचा हा निर्णय अनाकलनीय आहे.

बावनकुळे म्हणाले, नागपूर खंडपीठाने दिलेला निर्णय राज्य सरकार व राज्य निवडणूक आयोगाला मान्य करावा लागतो. मी यापूर्वी अनेकदा आयोगाला अशा पद्धतीने निवडणूक लांबणीवर न टाकण्याची विनंती केली होती. पण नियमांचा चुकीचा अर्थ काढला जात आहे. कारण, या संदर्भात कोणतीही हरकत किंवा

### बावनकुळेंचा संताप



तक्रार केली नव्हती.

नियमांचा चुकीचा अर्थ काढून निवडणूक आयोगाने निवडणूक पुढे ढकलली. किंबहुना निवडणूक पुढे ढकलायची होतीच, तर ज्या ठिकाणी आक्षेप होता, त्या ठिकाणच्या ढकलायच्या होत्या. यंदा पहिल्यांदाच असा प्रकार घडला आहे.

ते म्हणाले, निवडणूक लांबवणे, थांबवणे अथवा अशा पद्धतीचा घोळ घालणे योग्य नाही. त्याचे समर्थन कुणीही करू शकत नाही. कधीही सर्वपक्षीय बैठक नाही. विचारविनिमय नाही. हा एकप्रकारे जनतेला वेठीस धरण्याचा प्रकार आहे. निवडणूक आयोगाच्या घोळामुळे हायकोटार्ने असा निर्णय दिला. यामुळे उमेदवारांची घोर निराशा झाली आहे. हे अजिबात योग्य नाही, असेही बावनकुळे यावेळी बोलताना म्हणाले.

दरम्यान, मतमोजणी पुढे ढकलण्याच्या या निर्णयावर विरोधी पक्षातील नेत्यांनीही सडकून टीका केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोगाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केल्यानंतर विजय वडेट्टीवार यांनी अक्षरशः आग ओकली.

ते म्हणाले, निवडणुका म्हणजे पोरखेळ झालाय! सुप्रीम कोर्टाच्या निकालाचा चुकीचा अर्थ काढून सरकारने ओबीसी आरक्षणाची दिखाऊ माळ बांधली. आयोग सरकारच्या हातातील बाहुले झालाय. मतमोजणी लांबणीवर टाकून मत चोरीचा प्रकार तर नाही ना? अशी गंभीर शंका त्यांनी व्यक्त केली.

रोहित पवार यांनी आयोगाच्या बदलत्या आदेशांवर प्रश्नचिन्ह उभं करताना सांगितलं, या गोंधळामुळेच विषय कोर्टात गेला. आता २१ तारखेपर्यंत ईव्हीएम संदर्भात विशेष काळजी घ्यावी लागणार.

**विरोधकांनी पेट्यांजवळ खाट टाका!**

भाजपचे गिरीश महाजन यांनी उपरोधिक फटकारा लागवत म्हटलं, पहिल्यांदाच एवढा गोंधळ झाला आहे. आता १८ दिवस पेट्या बदलल्या म्हटलं जाईल. विरोधकांनी पेट्यांजवळ खाट टाकून बसावं, एक मिनिट बाजूला जाऊ नये!

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी आरोप करताना म्हटलं, ही लोकशाही आहे की बाहुल्यांचा खेळ? मंत्रालयात बसलेला कोणीतरी कार्यक्रम बनवतो आणि आयोग त्याची अंमलबजावणी करतो! उच्च शिक्षित अधिकाऱ्यांकडून अशा चुका? ही अत्यंत गंभीर बाब आहे.

माजी आमदार रमेश कदम यांनी आयोगाच्या गलथान कारभारावर टीका केली. अर्ज दाखल करतानाच गोंधळ, अपीलमध्येही तसंच आणि आता मतदान आज, मतमोजणी १८ दिवसांनी? हा ताण सर्वपक्षीय उमेदवारांना भोगावा लागणार.

## बुलढाण्यात बोगस मतदान

### शिंदेसेनेच्या आमदाराची दादागिरी?




■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २ :
नगरपालिका निवडणुकीत बुलढाण्यात पहाटेच आरोप-प्रतिआरोपांचे सावट गडद झाले आहे. मतदानाची सुरुवात होऊन अवघा काही वेळ जाईपर्यंतच बोगस मतदानाचा मोठा खेळ उघडकीस आल्याचा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी करताच राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

सपकाळ यांनी सत्ताधारी भाजपा महायुतीवर थेट निशाणा साधत आरोप केला की, ग्रामीण भागातून गाड्यांमध्ये भरून बोगस मतदार बुलढाण्यात आणले गेले आणि प्रशासन व पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली.

काँग्रेस कार्यकर्त्यांनी या बनावट मतदारांना पकडल्यावरच सगळा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर स्थानिक आमदारांच्या समर्थकांनी पोलिसांशी हुज्जत घालून परिस्थिती आणखी गोंधळात टाकली, अशी माहितीही सपकाळ यांनी दिली.

प्रकरणाचा केंद्रबिंदू ठरला प्रभाग क्र. १५ मधील गांधी प्राथमिक शाळेतील मतदान केंद्र. येथे वैभव देशमुख यांच्या नावावर कोथळी (ता. मोताळा) येथील एका व्यक्तीने बोगस मतदान केल्याचे काँग्रेसने पकडले. एवढेच नाही, तर कोथळी व इब्राहिमपूर येथून गाड्यांमध्ये भरून अनेक लोकांना बुलढाण्यात आणण्यात आल्याचे सपकाळ यांनी सांगितले. घाटाखालून भरून आणलेल्या या बोगस मतदारांमागे सत्ताधाऱ्यांचा स्पष्ट हात आहे, असा ठपका त्यांनी ठेवला.

सपकाळ म्हणाले, भ्रष्टाचार, गुंडगिरी आणि लोकशाहीची थट्टा सत्ताधारी पक्ष आज हे तीनही प्रकार प्रत्यक्षात दाखवत आहे. पण काँग्रेसला अनुकूल वातावरण असून, लोकशाहीचा विजय निश्चित होणार. त्यांनी निवडणूक आयोग व पोलिस प्रशासनावर कठोर टीका करत, ह्लबोगस मतदान करवणाऱ्यांवर आणि करवून घेणाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करा, अशी मागणी केली. बुलढाण्याच्या मतदानाला फक्त दीड तास झाले आणि बोगस मतांची पहिली खेप पकडली गेली झ्र यामुळे उर्वरित दिवसभराचा निवडणूक थरार नेमकं कोणते वळण घेणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

प्रभाग क्रमांक १५ साठी गांधी प्राथमिक शाळा येथे मतदान केंद्र आहे. येथे असलेल्या वैभव देशमुख नामक व्यक्तीच्या नावावर मोताळा तालुक्यातील एका जणास थेट उमेदवाराने मतदान केल्यानंतर पकडले आहे. त्याच्यासोबत आणखी एक युवक आहे. अशा इतरही काही घटना उघडकीस आल्याची माहिती आहे.

## निवडणूक आयोग गोंधळलेला

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २ :



आयोगाने निर्णय घ्यायचा ते न्यायदेवतेला घ्यावे लागत आहेत. प्रत्येक वेळी त्यांचे कान पिळावे लागत आहेत. किती हा गोंधळ आहे. इतका गोंधळलेला निवडणूक आयोग मी कधीही पाहिला नाही.

यापूर्वीचे निवडणूक आयोग स्वायत्त असायचे. त्यांच्यात निर्णयक्षमता होती. सत्ताधारीही त्यांच्यापासून सावध असत. आता सत्तेच्या दबावाखाली निवडणूक आयोग काम करू लागले आहे. स्वतः निर्णय घेऊ शकत नसल्याने मग प्रत्येक ठिकाणी गोंधळ उडू लागला आहे, अशी टीका काँग्रेसच्या नेत्या, माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी केली आहे.

यशोमती ठाकूर म्हणाल्या, राज्यातील नगरपालिका, नगरपंचायतींसाठी आज मतदान पार पडले. उर्वरित ठिकाणी येत्या २० डिसेंबरला निवडणूक होणार आहे. २ डिसेंबरच्या मतदानाचा निकाल उद्या, ३ डिसेंबरला जाहीर झाल्यास आगामी निवडणुकांवर त्याचा परिणाम निश्चित होणार. निवडणूक आयोग साधारणतः अशा परिस्थितीत दोन्ही टप्प्यांचे एकत्र निकाल जाहीर करते.

गोंधळलेल्या आयोगाला इतकेही कळाले नाही. आता २१ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे, आज झालेल्या मतदानानंतर जवळपास २० दिवस आता काळजी घ्यावी लागणार आहे. ईव्हीएम छेडछाड होऊ नये यासाठी सजग राहावे लागणार आहे.

सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला होणार आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, आज मतदान झाले तरी सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी केली जाईल.

## भाजप उमेदवाराच्या नातेवाईकांकडून पैसे वाटपाचे व्हीडीओ सार्वत्रिक

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २ :
राजुरा नगर पालिका निवडणुकीत भाजप उमेदवारांच्या नातेवाईकांकडून तसेच पदाधिकाऱ्यांकडून मतदारांना उघडपणे पैसे वाटप केले जात असल्याचे व्हीडीओ समाज माध्यमावर सार्वत्रिक झाल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांनी जिल्हाधिकारी, तहसीलदार, निवडणूक अधिकारी तथा राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे.




या जिल्ह्यात बल्लारपूर, भद्रावती, वरोरा, चिमूर, ब्रम्हपुरी, नागभीड, मूल, राजुरा, गडचांदूर नगर पालिका व भिसी नगर पंचायत येथे आज मतदान होत आहे. मतदानाच्या एक दिवस अगोदर तसेच मतदानाच्या दिवशी भाजपाकडून उघडपणे मतदारांना पैसे वाटप केले जात असल्याचे व्हीडीओ समाज माध्यमावर सार्वत्रिक झाले आहे.

निवडणुक प्रचाराच्या रणधुमाळीत काँग्रेस खासदार प्रतिभा धानोरकर यांनी राजुरा येथे भाजपा कडून मतदारांना दोन हजाराचे टोकन व मतदानानंतर तीन हजार रुपए दिले जात असल्याचा आरोप केला होता. मागील दोन दिवसातील घडामोडी बघता खासदाराचा हा आरोप खरा असल्याचे दिसून आले.

राजुरा पालिकेच्या प्रभाग क्रमांक ४ चे भाजपा उमेदवार अमोल चिल्लावार यांचे वडील पांडूरंग चिल्लावार यांनी मतदारांना एक दिवसांपूर्वी पैसे वाटप केल्याचा व्हीडीओ समोर आला आहे. पांडूरंग चिल्लावार एका ठिकाणी खूर्चीवर बसून हातात पैशाचे बंडल घेवून उघडपणे मतदारांना पैसे वाटप करित असल्याचे दिसत आहे. वार्ड क्रमांक सहा मध्ये भाजप पदाधिकारी हरीदास झाडे पैसे वाटप करित असल्याचे दिसत आहेत.

दरम्यान जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांनी भाजपा उमेदवार, त्यांचे नातेवाईक व भाजप पदाधिकारी मतदारांना पैसे वाटप करित असल्याची तक्रार जिल्हाधिकारी, तहसीलदार, निवडणूक अधिकारी तथा राज्य निवडणूक आयोगाकडे केल्याची माहिती लोकसत्ताशी बोलतांना दिली. तसेच भाजपाचे लोकप्रतिनिधी मतदान केंद्रावर जावून मतदारांना इशारे करित आहेत.

मतदान प्रक्रियेत अशाप्रकारे मतदान केंद्रावर जावून हालचाली करता येत नाही. मात्र राजुरा येथे हा प्रकार सर्रास सुरू असल्याचे धोटे यांनी सांगितले.

## आदिवासी कलाकृतींचा जगभर डंका

## 'बांबू लेडी'ची किमया

आयुष्य जगत असताना एखादे ध्येय मनाशी ठरवून त्या दिशेने सतत चालत राहणाऱ्यांना यश हमखास मिळते. याचे आदर्श उदाहरण म्हणजे चंद्रपूर येथील बंगाली झोपडपट्टीत राहणाऱ्या मीनाक्षी वाळके या होय.

बांबूपासून विविध वस्तू बनवण्याचं कौशल्य मिळवलेल्या मीनाक्षी यांनी यातूनच अनेक आदिवासी महिलांना रोजगार मिळवून दिलाय. त्यांनी बनवलेल्या बांबूच्या कलाकृतींना मोठी मागणी आहे. विशेष म्हणजे या कार्यामुळेच त्यांना 'द बांबू लेडी ऑफ इंडिया' या नावानं ओळखलं जातंय.

नागभीड तालुक्यातील सावरगाव येथे त्यांचे बालपण आणि शालेय शिक्षण झाले. 2014 मध्ये विवाह झाल्यानंतर शिक्षण थांबले. दुसऱ्या प्रसूतीदरम्यान सातव्या महिन्यातच मुलीचा मृत्यू झाला. पण रुग्णालयातून आल्यावर अवघ्या बारा दिवसांत त्यांनी हाती बांबू घेतला. चंद्रपुरातील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी त्या रुजू झाल्या गडचिरोली भामरागड, चंद्रपूर आदी ठिकाणच्या परिघात बांबू मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

साधारणतः पाच वर्षांपूर्वी त्यांच्या डोक्यात बांबूपासून कलाकृती तयार करण्याची कल्पना आली आणि त्यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. कालांतराने यात सुधारणा होत गेली. अनेक तंत्रज्ञान आणि मशीनच्या साह्याने त्यांनी नाविन्यपूर्ण कलाकृती घडवल्या आहेत. त्यांच्यासह समाजातील अनेक गरजू घटकापर्यंत या उद्योगातून रोजगार निर्मिती होत आहे. महिला सबलीकरण, आत्मनिर्भर महिला यासाठी आज हा उपक्रम अनेकांसाठी वरदान ठरला आहे, असे मीनाक्षी सांगतात. मीनाक्षी यांनी तयार केलेल्या बांबूच्या वस्तूंना जगभरात मागणी आहे. त्यामुळेच त्यांची जगभरात वेगळी ओळख निर्माण झालीय. इंग्लंडची संसद हाउस ऑफ कॉमन्समध्ये आयआयडब्लूशी इंस्पिरेस अवॉर्ड प्राप्त करणाऱ्या मीनाक्षी वाळके या भारतातील पहिल्या बांबू कलावंत आहेत. 'द बांबू लेडी ऑफ इंडिया' म्हणून त्यांना गौरवण्यात आलं आणि तीच त्यांची ओळख बनली.



लोकमानस

कुठलाही वारसा किंवा पाठबळ नसताना मीनाक्षी वाळके यांनी अभिसार इनोव्हेटिव्ज नावाचा सामाजिक उद्योग सुरू केला. झोपडपट्टीतील ग्रामीण भागातील मुली आणि बायकांना प्रशिक्षण देऊन रोजगार देता देता त्यांचे काम वाढत आहे. गरीब आदिवासी महिलांना रोजगार मिळावा म्हणून मीनाक्षी यांनी बांबू राखीचे नवनवे प्रयोग केले. लंडन, स्वीडन, फ्रान्स, कॅनडा देशात बांबू राखी पोहोचली. त्यांच्या अद्भुत कौशल्याची भुरळ इस्रायल देशाला पडली., कॅनडाच्या इंडो कॅनडियन आर्ट्स अॅण्ड कल्चरल इनिशिएटिव्ह संस्थेचा वूमन हीरो पुरस्कार मिळाला. आज त्यांच्या माध्यमातून असंख्य महिलांना बांबू कलाकृतीचे प्रशिक्षण आणि स्वयंरोजगार उपलब्ध होत आहे. शिवाय भारतीय कलाकृती देशाच्या सीमा ओलांडून जात आहेत. हे अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

■ ■ ■

## भरधाव टेम्पोच्या धडकेत तरुणीचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २ :
पुण्यातील टिळक रस्त्यावरील हिराबाग चौकात भरधाव टेम्पोच्या धडकेत एका दुचाकीस्वार तरुणीचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी स्वारगेट पोलिसांनी टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मृत्यू झालेल्या तरुणीचे नाव आरिबा कुरेशी (वय २०, रा. फेअर ग्रेस सोसायटी, न्यू मोदीखाना, लष्कर, पुणे) असे आहे. टेम्पोचालक विश्वंभर सोनवणे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरिबाचे वडील अर्शदअली अख्तरअली कुरेशी (वय ५५) यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरिबा टिळक रस्त्यावरून स्वारगेटकडे दुचाकीने जात असताना हिराबाग चौकात भरधाव टेम्पोने तिच्या दुचाकीला धडक दिली.

या अपघातात आरिबा गंभीर जखमी झाली. तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक बी. पी. शिरसट या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## नगाराचे बटन दाबताच कमळाचा लाईट

### संतप्त मतदाराने जमिनीवर आपटली ईव्हीएम मशीन

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २ :
गडचांदूर नगर पालिका निवडणुकीत एका मतदाराने नगारा चिन्हाची बटन दाबली असता भाजपाच्या कमळ चिन्हाचे लाईट लागल्याचे निदर्शनास आले. या प्रकारामुळे संतापलेल्या मतदाराने मतदान केंद्रातच ईव्हीएम मशीन जमिनीवर पटकून फोडून टाकल्याची घटना सायंकाळी ५.२० मिनिटांनी घडली. या प्रकारामुळे मतदान केंद्रावर एकच गोंधळ उडाला आहे.

दरम्यान संतप्त मतदारांनी भाजपा निषेधाच्या घोषणा देत अशा पध्दतीने निवडणूका होत असतील तर काय फायदा, या देशात लोकशाही जिवंत आहे काय असा प्रश्न निवडणूक अधिकाऱ्यांना केला.

गडचांदूर येथे सकाळी सात वाजतापासून नगर पालिका निवडणुकीसाठी मतदानाला सुरूवात झाली. तीन प्रभागातील मतदान केंद्रावर सकाळी शांततेत मतदान सुरू होते. मात्र त्यानंतर ईव्हीएम मशीनमध्ये अचानक बिघाड झाल्याने काही वेळासाठी मशीन बंद करण्यात आली. त्यामुळे मतदान केंद्रावर मतदारांची मोठी रांगच लागली. दरम्यान त्यानंतर पून्हा सुरळीत मतदान सुरू झाले.

मात्र सायंकाळी ५.२० वाजताच्या सुमारास आदर्श हिंदी विद्यालय बुथ क्रमांक २ येथे राम दुर्गे हा मतदार मतदान करण्यासाठी गेला. त्याने नगारा चिन्हा समोरचे बटण दाबले. मात्र भाजप उमेदवाराच्या नावासमोरील कमळ चिन्हाचा लाल



लाईट लागला. या प्रकारामुळे दुर्गे चक्रावून गेला. त्याने मतदान केंद्र अधिकाऱ्याकडे तक्रार केली.

दरम्यान त्याच वेळी या प्रकारामुळे संतापलेल्या दुर्गे याने ईव्हीएम मशीन हातात पकडली आणि जमिनीवर जोरदार पटकून मशीनच फोडून टाकली. या प्रकारामुळे मतदान केंद्रावर एकच गोंधळ उडाला.

यावेळी मतदान केंद्रावर तैनात पोलिसांनी सर्वप्रथम दुर्गे यांन ताब्यात घेतले. मात्र आपला काहीच गुन्हा नाही, ईव्हीएम मध्ये नगारा चिन्हाला मत दिल्यानंतर कमळाचा लाईट लागला. हा प्रकार योग्य नाही. येथे अशाच प्रकारे मतदान झाले आहे, त्यामुळेच अशा पध्दतीने संताप व्यक्त केल्याचे सांगितले.

## सुझुकी मोटरसायकलची नोव्हेंबर मध्ये १,२२,३०० युनिट्स विक्री

SUZUKI

सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रा. जपानमधील सुझुकी मोटर कॉर्पोरेशनची दुचाकी उपकंपनी ने नोव्हेंबर २०२५ साठी विक्री कामगिरी जाहीर केली, ज्यामध्ये एकूण १,२२,३०० युनिट्सची विक्री झाली, जी नोव्हेंबर २०२४ मध्ये विकल्या गेलेल्या ९४,३७० युनिट्सपेक्षा वार्षिक ३०% जास्त आहे.

देशांतर्गत बाजारपेठेत, नोव्हेंबर २०२५ मध्ये एसएमआयपीएलची विक्री ९६,३६० युनिट्सवर पोहोचली. गेल्या वर्षी याच महिन्यात विकल्या गेलेल्या ७८,३३३ युनिट्सपेक्षा ही २३% लक्षणीय वाढ आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कंपनीच्या कामगिरीमुळे या गतीला पाठिंबा मिळाला, कारण नोव्हेंबर २०२५ मध्ये निर्यातीत ६२% वाढ झाली आणि ती २५,९४० युनिट्सपर्यंत पोहोचली, जी नोव्हेंबर २०२४ मध्ये १६,०३७ युनिट्स होती.

विक्री कामगिरीवर भाष्य करताना, सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे विक्री आणि विपणन उपाध्यक्ष दीपक मुत्रेजा म्हणाले, आमच्या ग्राहकांचा सुझुकीवरील वाढत्या विश्वासाबद्दल आम्ही आभारी आहोत. आमच्या डीलर नेटवर्कच्या समर्पित प्रयत्नांसह त्यांचे समर्थन आमच्या वाढीला चालना देत आहे. आमची उपस्थिती मजबूत करण्यासोबतच, आम्ही रायडर्सना ब्रँडच्या जवळ आणण्यासाठी ग्राहकांशी संलग्नता उपक्रम आणि अनुभव-नेतृत्व कार्यक्रमांचा विस्तार देखील करत आहोत. ते पुढे म्हणाले, आम्ही शाश्वत वाढीच्या दिशेने काम करत असताना प्रवेशयोग्यता, विक्रीनंतरचा अनुभव आणि समुदाय-निर्माण वाढवण्यासाठी मोठी गुंतवणूक करत राहू.

■ ■ ■

### ..असा लागला शोध शिवनासाठीची सुई

सुईचा शोध हजारो वर्षांपूर्वी लागला, जेव्हा मानवाने हाडे आणि शिंगांसारख्या नैसर्गिक वस्तूंचा वापर करून शिवणकाम करण्यास सुरुवात केली. कालांतराने धातूचा वापर सुरू झाल्यावर, कांस्ययुगात (सुमारे ७००० ईसापूर्व) तांबे, कांस्य आणि लोखंड यांसारख्या धातूंपासून सुया बनवल्या जाऊ लागल्या. सुरुवातीच्या सुया हाडे, शिंगे किंवा लाकूड यांसारख्या नैसर्गिक साहित्यापासून बनवल्या जात होत्या. धातूकाम शिकल्यानंतर, सुमारे ७००० ईसापूर्व काळात कांस्ययुगात तांबे, कांस्य आणि नंतर लोखंड यांसारख्या धातूंपासून सुया बनवण्यास सुरुवात झाली. आधुनिक काळातील सुया उच्च कार्बन स्टीलच्या तारांपासून बनवल्या जातात आणि त्या गंजू नयेत म्हणून त्यावर निकेल किंवा सोन्याचा मुलामा दिलेला असतो. नंतरच्या काळात, १८व्या शतकात, थॉमस सेंट यांनी शिवणकाम यंत्राचा शोध लावला, ज्यामध्ये सुईचा वापर केला जात होता. १८३० मध्ये बार्थलेमी थिमोनियर यांनी पहिल्या यशस्वी शिलाई यंत्राचा शोध लावला, ज्यामध्ये हुक असलेली सुई वापरली जात होती.



■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

■ ■ ■

## अवैध वाळू उपसा : जिल्ह्यात ५ हायवा जप्त

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २ :
महसूल विभागाने अमरावती तालूक्यातील अवैधरीत्या वाळू उपसा व वाहतूकीवर धडक कारवाई केली. या कारवाईत पाच हायवांवर कारवाई करण्यात आली. पाचही हायवा जप्त करून नवीन तहसील कार्यालयात ठेवण्यात आले आहेत. जिल्ह्यात अनेक भागात वाळू तस्करी सुरूच आहे.

अवैध गौण खनिज वाहतूकीला आळा घालण्यासाठी भरारी पथकांद्वारे वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. तपासणी दरम्यान अवैध गौण खनिज उपसा व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येत आहे. जिल्हा खनिकर्म अधिकारी प्रणीता चापले, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसीलदार विजय लोखंडे यांचे पथक गस्तीवर होते.

अमरावती-डवरगाव रस्त्यावर वाहन तपासणी दरम्यान एमएच २७/ डीटी ९३६६, एमएच २७ डीटी ६४९४, एमएच २७/ डीटी ४५५५, एमएच २७ /डीएल ६४९४ , एमएच २७/ डीटी १४८० क्रमांकाचे हायवा अवैधरीत्या रेती वाहतूक करीत असल्याचे आढळून आले. पाचही ट्रक पथकाद्वारे मुद्देमालासह जप्त केले. जप्त केलेले हायवा पुढील कार्यवाहीसाठी अमरावती तहसील कार्यालय येथे ठेवण्यात आले आहे.

सदर कारवाईत मंडळ अधिकारी सुनील



उगले, गजानन हिवसे, ग्राम महसूल अधिकारी सुनिल भगत, हेमंत गावंडे, रामकृष्ण इंगळे, पवन बोंडे, रामदास गोडे आणि पोलीस यांनी सहभाग घेतला.

**परवाने निलंबित होणार**

राज्यातील वाळू तस्करी रोखण्यासाठी राज्य सरकारने कठोर उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार आता वाळू तस्करी करणारी वाहने सापडल्यास परवाने निलंबित किवा तिस?यांदा गुन्हा सापडल्यास वाहनांचा परवाना कायमचा रद्द केला जाणार आहे. महसूल विभागाने बुधवारी याबाबतचे परिपत्रक जारी केले आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वाळू आणि इतर गौण खनिजांच्या चोरीमुळे सरकारी महसुलाची आणि पर्यावरणाची मोठी हानी होते. याशिवाय अवैध व्यवसायातून गुन्हेगारी वाढत असून कारवाईसाठी जाणाऱ्या सरकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन अधिनियम १९८८च्या कलम ८६ अंतर्गत कारवाई केली जाणार आहे. पहिला गुन्हा झाल्यास ३० दिवसांसाठी परवाना (परमिट) निलंबित करून वाहन जप्त केले जाणार आहे.

त्यानंतर पुन्हा गुन्हा केल्यास दोन महिन्यांसासाठी परवाना रद्द करून वाहन जप्त केले जाणार आहे. त्यानंतरही न ऐकल्यास आणि तिसऱ्यांदा सापडल्यास कायमचा परवाना रद्द करून प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत पुढील कारवाईसाठी वाहन जप्त केले जाणार आहे.